रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १८७
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## दावोस दौऱ्यातून राज्यात ३० लाख कोटींची गुंतवणूक

**दावोस :** येथील दौऱ्याच्या माध्यमातून महाराष्ट्रात ३० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली



असून आणखी सात ते १० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. २२) दिली. दूरस्थ पद्धतीने झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या गुंतवणुकीपैकी ८३ टक्के करार थेट परकीय गुंतवणुकीचे आहेत. १६ टक्के गुंतवणूक ही परकीय कंपन्यांची आहे, असे त्यांनी सांगितले. यात उद्योग, सेवा, कृषी, तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रांचा समावेश आहे. देशात ज्या घटकांची आयात होते, त्यासाठी पर्यायी घटकांच्या निर्मितीच्या उद्देशाने ही गुंतवणूक होत आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी मोठ्या गुंतवणुकी आल्या असून कोकणात साडेतीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.


### अंतरंग

बंडखोर अमर म्हात्रेचे भाजपकडून निलंबन/२

खोकरी घुमटाची माहिती आता ऑडिओ स्वरूपात/५

प्रजासत्ताकदिनी मुंबईत कुस्तींची महादंगल/८


# महापौरपदाचे आरक्षण जाहीर

## पनवेल महापालिकेत ओबीसीला बहुमान

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील २९ महापालिकांमधील महापौरपदाची आरक्षणाची सोडत गुरुवारी (दि. २२) नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. पुढील अडीच वर्षांसाठी ही सोडत काढण्यात आली असून २९ महापालिकांपैकी १५ महापालिका विविध प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.



२९ महापालिकांपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एकच पद आरक्षित होत आहे. नियमातील तरतुदीनुसार अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी पद देय होत नाही. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी तीन पदे आरक्षित झाली असून त्यापैकी दोन पदे अनुसूचित जाती (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी आठ पदे आरक्षित झालेली असून त्यापैकी चार पदे नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत. उर्वरित १७ महापालिकांमधून सर्वसाधारण महिला या प्रवर्गासाठी नऊ पदे येत असून आठ पदे खुला (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी आहेत.

### असे आहे आरक्षण

- **अनुसूचित जमातीसाठी राखीव :** कल्याण-डोंबिवली
- **अनुसचित जातीसाठी राखीव :** ठाणे (सर्वसाधारण), जालना (महिला), लातूर (महिला)
- **नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) :** पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर, उल्हासनगर.
- **नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) :** जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर, अकोला.
- **सर्वसाधारण प्रवर्ग :** छत्रपती संभाजीनगर, परभणी, सांगली-मिरज-कुपवाड, अमरावती, वसई-विरार, सोलापूर, पिंपरी-चिंचवड, भिवंडी-निजामपूर.
- **सर्वसाधारण (महिला) :** पुणे, धुळे, बृहन्मुंबई, नवी मुंबई, नांदेड-वाघाळा, मालेगाव, मीरा-भाईंदर, नागपूर, नाशिक.

## महाराष्ट्रात गुटखाबंदीसाठी स्वतंत्र कायदा होणार

**मुंबई :** महाराष्ट्रात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांवर पूर्ण बंदी घालण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात येणार आहे. गुजरातमध्ये लागू असलेल्या दारूबंदी कायद्याच्या धर्तीवर या संदर्भात अभ्यासाअंती आवश्यक प्रस्ताव सादर करून कायद्याचा मसुदा तयार करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात अन्न व औषध प्रशासन व गृह विभागाच्या संयुक्त पथकाची स्थापना करण्याचे तसेच अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांविरोधात 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव मांडला होता.

## पंचायत समिती निवडणुकीत भाजप महायुतीचे तीन उमेदवार बिनविरोध

**रत्नागिरी, सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

राज्यात नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत बिनविरोध पॅटर्न पहावयास मिळाला. आता पुन्हा जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत हा पॅटर्न दिसून येत आहे. सिंधुदुर्गात पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपचे दोन, तर रत्नागिरीत शिंदे शिवसेनेचा एक असे महायुतीचे तीन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

रत्नागिरीच्या नाणीज पंचायत समिती गणातून शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार डॉ. पद्मजा कांबळे यांच्याशिवाय कुणीही अर्ज दाखल केला नव्हता. कांबळे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली.



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकिसरे पंचायत समिती गणातूनही साधना नकाशे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्या बिनविरोध विजयी झाल्या आहेत. याशिवाय बिडवाडी पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजप उमेदवाराला लॉटरी लागली. या ठिकाणी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून विद्या शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली होती, मात्र अर्ज छाननीत तीन अपत्यांच्या कारणास्तव शिंदे यांचा अर्ज बाद झाला.

## जम्मू-काश्मीरमध्ये सैन्याचे वाहन दरीत कोसळून १० जवान शहीद



**श्रीनगर : वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरमधील दोडा जिल्ह्यातील भादरवाह भागात गुरुवारी (दि. २२) भारतीय सैन्याची गाडी दोनशे फूट दरीत कोसळून १० जवान शहीद झाले, तर इतर जवान जखमी झाले आहेत.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार १७ जवानांना घेऊन जाणारी भारतीय लष्कराची बुलेट प्रुफ गाडी ही उंचावरील पोस्टकडे चालली होती. त्यावेळी चालकाचा गाडीवरील ताबा सुटला आणि गाडी दोनशे फूट खोल दरीत कोसळळी.

या दुर्घटनेची माहिती मुळताच लष्कराच्या आणि पोलिसांच्या टीमने त्वरित मदतकार्य सुरू केले. स्थानिक लोकांनीदेखील पोलीस आणि रेस्क्यू टीमला मदत केली. यादरम्यान, १० जवानांचे मृतदेह तसेच जखमींना बाहेर काढण्यात आले. जखमींना हेलिकॉप्टरमधून उधमपूरच्या कमांड रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिथे त्यांच्यावर विशेष उपचार सुरू आहेत.

लष्कराने दिलेल्या माहितीनुसार या अपघाताची चौकशी सुरू केली असून जखमी जवानांना सर्वोत्तम उपचार देण्यात येत आहेत.

## पनवेलमध्ये शेकापला धक्का!

### दुंदरे येथील उसाटकर कुटुंबीय समर्थकांसह भाजपमध्ये दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला आहे.

दुंदरे येथील गुरूनाथ रामदास उसाटकर, बारक्या नामदेव उसाटकर, विनायक रामदास उसाटकर, आशीर्वाद गुरूनाथ उसाटकर तसेच सिद्धेश तुळशीराम उसाटकर यांनी त्यांच्या अनेक समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. प्रवेशाचा हा कार्यक्रम कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाला.



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे भाजपमध्ये स्वागत करत संघटन वाढीसाठी आणि विकासाच्या राजकारणासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी नगरसेविका नीता माळी, माजी सरपंच रमेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य शांताराम चौधरी, नाना पाटील, संदीप पाटील, राजेश चौधरी, संतोष चौधरी, कृष्णा सिनारे, रूपेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### निवडक

#### केंद्रीय निवडणूक आयोगाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मचे उद्घाटन

**नवी दिल्ली :** भारत निवडणूक आयोगाने इंडिया इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन डेमोक्रसी अ‍ॅण्ड इलेक्शन मॅनेजमेंट (आयआयसीडीईएम) २०२६ दरम्यान ईसीआयनेट (ईसीआयएनईटी) या एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्मचे उद्घाटन केले. २१ ते २३ जानेवारीदरम्यान भारत मंडपम, नवी दिल्ली येथे ही तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ईसीआयनेट हा जगातील सर्वात मोठा निवडणूक सेवा प्लॅटफॉर्म असून भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील निवडणूक आयोगाच्या ४०हून अधिक अ‍ॅप्स आणि पोर्टल्सचे एकत्रीकरण यात करण्यात आले आहे.

#### बांगलादेश क्रिकेट संघाचा टी-२० वर्ल्डकपवर बहिष्कार

**ढाका :** आगामी आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) आपला संघ भारतात न पाठवण्याचा अधिकृत निर्णय जाहीर केला आहे. बीसीबीच्या अंतर्गत बैठकीत हा टोकाचा निर्णय घेण्यात आला. तत्पूर्वी, २१ जानेवारीला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) बांगलादेशला स्पष्ट इशारा दिला होता की, जर त्यांनी स्पर्धेतून माघार घेतली, तर ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेत त्यांच्या जागी स्कॉटलंडचा समावेश केला जाईल.

## पेणमधील वाशी नाक्याजवळ गॅस सिलिंडरची गाडी पेटली

### स्फोटांसह आगीचे लोळ; नागरिकांमध्ये घबराट



**पेण : प्रतिनिधी**

मुंबई -गोवा महामार्गावर पेणमधील वाशी नाक्याजवळ गुरुवारी (दि. २२) सकाळी १०च्या सुमारास घरगुती गॅस सिलिंडर घेऊन जाणाऱ्या पीकअप गाडीस आग लागल्याने एकच हाहाकार उडाला. या वेळी सिलिंडरचे स्फोट झाल्याने जवळजवळ दीड तास दोन्ही बाजूकडील वाहतूक रोखण्यात आली होती.

याबाबत माहिती अशी की, गुरुवारी नेहमीप्रमाणे वरदान भारत गॅस एजन्सी येथून सिद्धार्थ विठोबा ठाकूर (वय ३१, रा. काळेश्री, पेण) हा टाटा मेगा एक्सल पीकअप गाडीतून (एमएच ०६ बी डब्ल्यू ३०) पेण येथून वडखळ, डोलवी येथे ग्राहकांचे घरगुती गॅस सिलिंडर डिलिव्हरीसाठी घेऊन चालला होता. वाशी नाक्याजवळ गाडी आली असता अचानक वाहनाच्या इंजिनला लागली. या आगीमुळे गाडीत असलेल्या सिलिंडर्सला आग लागून ते बाहेर फेकले गेले. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

पेण नगर परिषदेचे अग्निशमन दल आणि जेएसडब्ल्यू कंपनीचे अग्निशमन पथक घटनास्थळी पोहचून आग आटोक्यात आणली. या वेळी काही अघटित घटना होऊ नये म्हणून पेण पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदीप बागुल व टीमने धाव घेत दोन्ही बाजूकडील वाहतूक रोखून धरली होती.

या आगीत गाडीमध्ये भरलेल्या ४८पैकी नऊ सिलिंडरचा स्फोट झाल्यामुळे रस्त्यावर आगीचे लोळ उठले होते, तर गाडी पूर्णतः जळून खाक झाली. या वेळी अग्निशमन कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणल्यानंतर पेण, वडखळ पोलीस व वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी वाहतूक सुरळीत केली.

## समाजहितासाठी एकदिलाने काम करा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे द्रोणागिरी महोत्सवात प्रतिपादन

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड येथे आई शांतेश्वरी सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित द्रोणागिरी महोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. यंदा या महोत्सवाचे तिसरे वर्ष होते. तब्बल दहा दिवस विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम रंगले. या महोत्सवाला बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत आयोजकांचे कौतुक केले.



या वेळी उपस्थितांना संबोधित करताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, आगरी-कोळी महोत्सवाच्या निमित्ताने आपण सर्वजण एकत्र येतो. जात-पात विसरून आपण सर्व भारतीय आहोत या भावनेतून एकत्र येणे आज काळाची गरज आहे. समाज आणि गावाच्या हितासाठी आपण एकदिलाने काम केले पाहिजे. आपल्या गावाचा आणि समाजाचा अभिमान प्रत्येकाने बाळगावा. आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी महोत्सवाच्या आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व सल्लागार यांचे आभार मानत हा महोत्सव दरवर्षी आणखी मोठ्या प्रमाणावर साजरा व्हावा अशा शुभेच्छा दिल्या.



व्यासपीठावर आणि कार्यक्रमस्थळी अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये महोत्सवाचे सल्लागार चंद्रकांत घरत, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, कामगार नेते सुरेश पाटील, उद्योगपती जानूशेठ म्हात्रे , मयूर म्हात्रे, पप्पू सूर्यकांत, स्वराज ठाकूर, गणेश घरत, प्रदीप म्हात्रे, परेश घरत, सागर घरत, निकेश म्हात्रे, पियुष घरत यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या महोत्सवात विविध सांस्कृतिक व करमणूकपर कार्यक्रम, स्थानिक कलाकारांचे सादरीकरण आणि सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. त्यामुळे संपूर्ण द्रोणागिरी परिसरात उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले.

## रायगड जिल्ह्यात माघी गणेशोत्सव उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गुरुवारी (दि. २२) माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा झाला. दर्शनासाठी प्रसिद्ध गणपती मंदिरांमध्ये भाविकांनी गर्दी केली होती. त्याचप्रमाणे गावोगावच्या गणेश मंदिरांमध्येही विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.





अलिबागच्या कुलाबा किल्ल्यातील ऐतिहासिक आंग्रेकालीन गणपती मंदिरात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने भजन, पूजन, जन्मोत्सव, आरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मध्यरात्री काकड आरतीने उत्सवाची सुरुवात झाली. गणेशभक्तांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले. सकाळी १०नंतर समुद्राला भरती असल्याने भाविकांनी भरती येण्यापूर्वीच सकाळी लवकर दर्शन घेणे पसंत केले. संध्याकाळी पुन्हा ओहोटीच्या वेळी मंदिरात गर्दी झाली होती. रात्री उशिरापर्यंत दर्शन सोहळा सुरू होता. या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दर्शनाला येणाऱ्या भाविकांकडून कुठलेही प्रवेश शुल्क न आकारण्याचा निर्णय पुरातत्व विभागाने घेतल्याने गणेशभक्तांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

अष्टविनायकांपैकी पालीचा बल्लाळेश्वर व महडचा सिद्धीविनायक ही दोन स्थळे रायगड जिल्ह्यात आहेत. येथील गणेश मंदिरे भाविकांनी अक्षरशः फुलून गेली होती. मुरूड तालुक्यातील नांदगाव येथील सिद्धीविनायक, चिरनेरचा महागणपती, अलिबाग तालुक्यातील नंदूरबाळ, कडावचा बालदिगंबर, जांभूळपाडा येथील सिद्धीगणेश, मुगवलीचा स्वयंभू गणेश अशा प्रमुख मंदिरांमध्येही भविकांची दर्शनासाठी गर्दी होती.

## पालघरमधील माकपचे आंदोलन स्थगित

**पालघर : प्रतिनिधी**

शेतकरी, आदिवासी आंदोलकांचे शिष्टमंडळ आणि जिल्हाधिकारी, सक्षम अधिकारी यांच्या समवेत झालेल्या चर्चेअंती प्रमुख मागण्यांबाबत सकारात्मक तोडगा निघाला. त्यामुळे पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेले आंदोलन पुढील तीन महिन्यांसाठी स्थगित करण्यात आले आहे.

जल, जंगल, जमिनीच्या प्रश्नांवर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली शेतकरी, आदिवासी बांधवांचा पालघर जिल्ह्यातील चारोटी ते जिल्हाधिकारी कार्यालय असा लाँग मार्च काढण्यात आला होता. चारोटी येथून सोमवारी निघालेला हा मार्च मंगळवारी सायंकाळच्या सुमारास पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला.

मोर्चेकऱ्यांना पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर अडवण्यात आले आणि आत जाण्यापासून अटकाव करण्यात आला. त्यामुळे आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोरच ठिय्या आंदोलन सुरू केले होते. या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांचे शिष्टमंडळ आणि जिल्हाधिकारी, सक्षम अधिकारी यांच्या समवेत मागण्यांबाबत तोडगा काढण्यासाठी बैठक घेत चर्चेला सुरुवात झाली. या वेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा होऊन मागण्यांची पूर्तता करण्यासंदर्भातील लेखी पत्र आंदोलकांना देण्यात आले. वनहक्क दाव्याबाबत वाढीव क्षेत्रफळाच्या मागणी संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करून वाढीव क्षेत्राचा पंचनामा करण्यात येणार आहे. त्यामुळे आंदोलन पुढील तीन महिन्यांसाठी स्थगित करत असल्याचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे डहाणूचे आमदार विनोद निकोले, डॉ. अशोक ढवळे यांनी जाहीर केले.

# सुरेंद्र चव्हाण, कृष्णा कदम यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

## लोहारे गट व कोतवाल बु. गणात उमेदवारी



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी भारतीय जनता पक्षामध्ये शिवसेना उबाठा पक्षाचे कार्यकर्ते आणि एकेकाळचे मनसेचे विधानसभा उमेदवार तसेच उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे जिल्हा समन्वयक सुरेंद्र (आण्णा) चव्हाण तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील वैद्यकीय दूत कृष्णा कदम यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. हा पक्षप्रवेश निवडणूक प्रमुख सतिश धारप तसेच जिल्हाध्यक्ष व खासदार धैर्यशील पाटील तसेच आ.रवीशेट पाटील यांच्या हस्ते पार पडला. या पक्षप्रवेशानंतर भाजपचे सर्वात आधी इच्छुक झालेल्या वैभव चांदे यांना निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर व्हावे लागले आहे.

या कार्यक्रमास भाजपचे बिपिनदादा म्हामुणकर, नागेंद्र राठोड, पोलादपूर तालुकाध्यक्ष वैभव चांदे, यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.यानंतर दुसऱ्याच दिवशी लोहारे जिल्हा परिषद गटातून कृष्णा कदम यांनी तर कोतवाल पंचायत समिती गणातून सुरेंद्र चव्हाण यांनी भारतीय जनता पक्षाकडून अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

पोलादपूर तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून एका राजकीय गटाचे मोठ्या प्रमाणात विभाजन सुरू असून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा काँग्रेस नंतर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे तेथून राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यापैकी काहीजणांचा भाजपमध्ये प्रवेश झाला असून नजिकच्या काळात हा राजकीय गट भाजपमय होण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

मात्र, या गटाची महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटासोबत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकपूर्व युती झाल्याने सद्यस्थितीत हा गट आणि भाजपचे कार्यकर्ते एकदिलाने काम करीत असल्याने भाजपची ताकद लोहारे जिल्हा परिषद गटामध्ये वाढलेली दिसून येत आहे.

भाजपचे भुमिपुत्र तसेच प्राधिकरणाचे कॅबिनेट दर्जाचे अध्यक्ष आ.प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखालील माजी मंडळ अध्यक्ष प्रसन्ना पालांडे यांच्या विचाराने पोलादपूर शहराध्यक्ष महेश निकम आदिंनी या दोन्ही कार्यकर्त्यांच्या प्रवेशाचे स्वागत केले आहे.

## बंडखोर अमर म्हात्रेचे भाजपकडून निलंबन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या गव्हाण जिल्हा परिषद गटाच्या अधिकृत उमेदवाराविरोधात पत्नीचा उमेदवारी अर्ज दाखल करून पक्षशिस्तीचा भंग केल्याबद्दल अमर केसरीनाथ म्हात्रे याचे भाजपमधून सहा वर्षांसाठी निलंबन करण्यात आले आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी केल्याचे स्पष्ट झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

भाजप ही शिस्तबद्ध संघटना असून पक्षाच्या निर्णयांचे पालन करणे प्रत्येक कार्यकर्त्याला बंधनकारक आहे, मात्र अमर म्हात्रे याने स्वतःच्या स्वार्थापोटी निर्णय घेत भाजपच्या अधिकृत उमेदवार निकिता निलेश खारकर यांच्या विरोधात सुनंदा म्हात्रे या आपल्या पत्नीचा उमेदवारी अर्ज दाखल करत पक्षशिस्तीचा भंग आणि बंडखोरी केली. त्यामुळे अमर म्हात्रेचे पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

## माटवण पं.स. गणात नामाप्र महिला अर्ज छाननीत अवैध

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर पंचायत समितीच्या माटवण, कापडे बुद्रुक, कोतवाल बुद्रुक आणि लोहारे गणात तसेच जिल्हा परिषदेच्या लोहारे आणि कापडे बुद्रुक गटातील निवडणुकीसाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांपैकी शेतकरी कामगार पक्षाचा माटवण पं.स.गणातील महिला नामाप्र आरक्षणाचा उमेदवारी अर्ज जातीचा दाखला न जोडल्याने छाननीत अवैध ठरल्यानंतर उर्वरित एका महिलेचा उमेदवारी अर्ज वैध ठरला. यानंतर शेकापक्षाचे महाड विधानसभा अध्यक्ष एकनाथ गायकवाड यांनी शिवसेनेचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे यांच्यासमवेत संयुक्त पत्रकार परिषद घेऊन रिपाइं व शिवसेनेसोबत युतीची घोषणा केली.

पोलादपूर तालुक्यात पंचायत समितीच्या चार गणांसाठी २४ तर जिल्हा परिषदेच्या दोन गटांसाठी ११ नामनिर्देशनपत्र दाखल झाले होते. गुरूवारी सकाळी नामनिर्देशनपत्रांच्या छाननीमध्ये माटवण पं.स.गणातील नामाप्र महिला आरक्षणासाठी शेकापतर्फे सुनीता पवार, साक्षी कांबळेकर या दोन उमेदवारी अर्जांपैकी सुनीता पवार यांच्या अर्जासोबत जातप्रमाणपत्र नसल्याने तो अवैध ठरविण्यात आला.

या गणामध्ये शिवसेनेने उमेदवारी अर्ज दाखल केला नसल्याने कापडे बुद्रुक गणाचे उमेदवार अनिल दळवी, चंद्रकांत सणस, बापू नाना जाधव, अनिल पवार आदींच्या प्रमुख उपस्थितीत माटवण पं.स.गणातील उमेदवार साक्षी कांबळेकर यांची उमेदवारी शिवसेना शेकापक्ष युतीची असल्याचे जाहीर केले.

## रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद गटाच्या सर्व उमेदवारांचे अर्ज वैध

### पंचायत समिती गणाचे दोन अर्ज मात्र अवैध

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समितीच्या गणाचे उमेदवार अर्जची छाननी गुरुवारी ( २२ जानेवारी ) रोजी रोहा शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे निवडणूक निर्णय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख, नायब तहसीलदार राजेश थोरे व गव्हाणकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले .या छाननी मध्ये जिल्हा परिषदेचे सर्व अर्ज वैध ठरले तर पंचायत समितीचे आंबेवाडी पंचायत गणातील दोन अपक्षांचे अर्ज अवैध ठरले जिल्हा परिषद गटाच्या ४ जागेसाठी ३४ उमेदवार रिंगणात आहेत. तर रोहा तालुक्यातील पंचायत समिती गणाच्या ८ जागेसाठी ६३ उमेदवार रिंगणात आहेत.

## स्पर्धा परीक्षांसोबत कौशल्य आधारित गुणवत्ता संपादन आवश्यक –जिल्हाधिकारी किशन जावळे

**अलिबाग : प्रतिनिधी**



स्पर्धा परीक्षांची तयारी करताना केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता रोजगाराभिमुख व कौशल्यावर आधारित गुणवत्ता आत्मसात करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

अलिबाग येथील स्पर्धा विश्व अकॅडमी येथे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या जिल्ह्यातील युवक–युवतींसाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन व मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन दि.२० जानेवारी रोजी करण्यात आले होते.स्वयंसिद्धा संस्था संचलित स्पर्धा विश्व अकॅडमी व प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला यावेळी ते बोलत होते. यावेळी ॲड. कलाताई पाटील, किरण करंदीकर, प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा व भारत सरकारच्या राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी, स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका व स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा सुचिता साळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी श्री जावळे म्हणाले की, स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वेळेचे योग्य नियोजन, सकारात्मक दृष्टिकोन आणि चांगली संगत अत्यंत महत्त्वाची आहे. स्पर्धा परीक्षांसोबतच कौशल्याधारित व रोजगाराभिमुख उपक्रम शिकल्यास भविष्यातील संधी वाढतात. स्वप्न मोठी पहा आणि ती पूर्ण होईपर्यंत सातत्याने प्रयत्न करा, त्यातूनच यश मिळते, असे सांगताना त्यांनी आपल्या वैयक्तिक प्रवासाचे उदाहरण दिले.

ध्येय साध्य करण्यासाठी डिटर्मिनेशन आणि कन्सिस्टन्सी या बाबी निर्णायक ठरतात तसेच स्पर्धा परीक्षांबरोबरच ‘प्लॅन बी’ तयार ठेवण्याचा सल्ला देत अपयश आल्यास खचून न जाता पर्यायी मार्गाने यश मिळवता येते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत गणेश जन्मोत्सवाला उसळला भक्तांचा महासागर

### श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अष्टविनायकांपैकी एक प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या श्री बल्लाळेश्वर विनायकाचा माघ मासोत्सव व जन्मोत्सव (गणेश जयंती) गुरुवारी (ता.२२) मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी धार्मिक कार्यक्रम व विधी करण्यात आले. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. यानिमित्त पालीत मोठी यात्रा देखील भरली आहे. यात्रेत कोट्यावधीची उलाढाल होताना दिसत आहे.



जन्मोत्सवाला बाळ गणेशाच्या मूर्तीला पाळण्यात टाकून भक्तिभावाने पाळणा हलविण्यात आला. यावेळी बल्लाळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष वैभव आपटे, विश्वस्त प्रमोद पावगी, अरुण गद्रे, विश्वास गद्रे, अमोल साठे व डॉ. पिनाकीन कुंटे आदींसह मंदिर मुख्य पुजारी गणेश कोणकर, गुरव, मान्यवर व भक्त उपस्थित होते. गणेश जयंतीच्या दिवशी आलेल्या भाविकांना चहा व अल्पोपहार देवस्थानकडून विनामूल्य देण्यात आला. तसेच पंचमीला सर्व भाविकांना महाप्रसाद म्हणून विनामूल्य भोजनाची व्यवस्था आहे. माघ महोत्सवानिमित्त प्रशासन व देवस्थान यांच्या समन्वयातून योग्य नियोजन करण्यात आले होते. बल्लाळेश्वर मंदिर गाभारा, सभामंडप व परिसरात आकर्षक रोषणाई आणि सजावट करण्यात आली आहे. मंदिराच्या बाहेर काढलेल्या विविध सुबक रांगोळी आलेल्या भाविकांचे लक्ष वेधत होते. अनेकजण त्या रांगोळ्या कॅमेऱ्यामध्ये कैद करत होते. अनेक जणांनी आपल्या व्हॉट्सअप व फेसबुक स्टेटसवर संपूर्ण पालीतील आणि गणपती, मंदिर व यात्रेचा ड्रोनद्वारे काढलेला व्हिडीओ तसेच फोटो ठेवले होते. यंदा मंदिराच्या समोरील तळ्याच्या भिंतीवर ऑपरेशन सिंदूरचे बॅनर लावण्यात आले आहेत.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलीस, तसेच देवस्थानचे सुरक्षारक्षक देखील तैनात करण्यात आले आहेत. अनेक भाविक बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पायी दिंडी काढत चालत आले होते. यामध्ये प्रामुख्याने उरण, पेण, पनवेल व अलिबाग आदी ठिकाणचे भाविक होते. पालखीच्या वेळी वीर गर्जना ढोल पथकाने वादन केले. या उत्सवासाठी तहसील कार्यालय, पोलीस प्रशासन, स्थानिक नगरपंचायत आणि ग्रामस्थांचे मोठे सहकार्य लाभत आहे. हा उत्सव शांततेत आणि आनंदात साजरा व्हावा, असे आवाहन देवस्थान प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

### वाहतूक व पार्किंगचे नियोजन

**शहरातील वाढती गर्दी आणि अरुंद रस्ते लक्षात घेता, तहसीलदार उत्तम कुंभार व पोलीस पोलीस प्रशासनाने पार्किंगचे स्वतंत्र नियोजन केले आहे. खासगी व मोठ्या बसेस: खोपोली आणि वाकण रोडवरील नियुक्त जागेवर उभ्या केल्या गेल्या. बाहेरगावाहून येणाऱ्या वाहनांसाठी पाली गावाच्या बाहेर तीन विविध दिशांना स्वतंत्र वाहनतळ उभारण्यात आले आहेत. मोफत शटल सेवा देण्यात आली आहे. पार्किंग स्थळापासून मंदिरापर्यंत भाविकांना आणण्यासाठी मोफत 'विक्रम' रिक्षांची सोय करण्यात आली आहे. एस.टी. बस: वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बस थांब्यांच्या जागेत तात्पुरता बदल करण्यात आला आहे.**

## डिजिटल क्रांतीत मैदानी खेळ हरवू नयेत –पंकज तांबे

**माणगाव : बातमीदार**



डिजिटल आणि संगणकीय युगात विद्यार्थ्यांनी झपाट्याने विकसित होत असणाऱ्या नवनवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर करताना मैदानी खेळांकडे दुर्लक्ष करू नये, कारण शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक सक्षमतेसह सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी क्रीडा क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे आहे, असा मोलाचा संदेश सामाजिक कार्यकर्ते पंकज तांबे यांनी दिला.

श्री. संत गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, बामणोली संचलित इंग्लिश स्कूल बामणोली, ता. माणगाव, जि. रायगड येथे आयोजित आंतरशालेय क्रीडा महोत्सव सन २०२५–२६ च्या भव्य उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय सहभाग घेऊन तालुका, जिल्हा व राज्याचा नावलौकिक वाढवण्याचे आवाहन केले. आंतर शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन गुरुवार दिनांक २२ जानेवारी रोजी सकाळी ९.०० वाजता विद्यालयाच्या भव्य पटांगणावर उत्साहात पार पडले. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते व शेतकऱ्यांचे नेते पंकज तांबे, बी. कॉन्ट्रॅक्टर सुबोध साळवी तसेच या शाळेची माजी विद्यार्थिनी व परिचारिका स्वागता गुगले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रणाली तांबे व कु. स्वरा तांबे उपस्थित होत्या.

## नवी मुंबई पालिकेतर्फे मालमत्ता कर वसुली

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत मालमत्ता कर वसुली मोहिमेला गती देण्यात आली असून थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने गुरुवार दिनांक २२ जानेवारी रोजी नेरुळ येथील तीन व्यावसायिक मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त सुनील पवार आणि उपायुक्त डॉ.अमोल पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागातील जप्ती पथकाकडून ही मालमत्ता जप्ती कारवाई करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेकडून जप्ती पथक स्थापन करण्यात आले आहे. शहरातील सर्व विभागीय कार्यालयांमार्फत ही मोहीम राबविण्यात येत असून थकबाकीदारांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. थकबाकीदारांच्या मालमत्तांना कर संकलन विभागीय कार्यालयांच्या जप्ती पथकांनी भेटी देण्यास सुरुवात केली असून थकीत मालमत्ताधारकांच्या मालमत्तांवर थेट सील व जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे.

## शिवभक्त आदिवासी आश्रमशाळेत धान्यवाटप

**अंबरनाथ : प्रतिनिधी**






आसावरी सेठ चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अंबरनाथमधील लव्हाळी (बोराडपाडा रोड) चरगाव येथील शिवभक्त आदिवासी आश्रमशाळेत धान्य वाटप करण्यात आले.

यामध्ये ५० पोते तांदूळ, ७ पोती तुरीची डाळ, ७ पोती मुगाची डाळ, २५ किलो गाईचे तूप, ३०० किलो कांदे, ३०० किलो बटाटे शाळेला ट्रस्टचे व्यवस्थापकीय संचालक निशांत सेठ, विश्वस्थ मुकुंद देशमुख, आत्माराम तोरस्कर, बी.निकीता, योगेश कुटे, शाळेच्या मुख्याध्यापिका साईली, रमेश कटेरे व सामाजिक कार्यकर्ते रवींद्र खोपकर आदींच्या उपस्थितीत देण्यात आले.

## दुखवटा

### हरजीवन शेट




**माणगाव :** प्रसिद्ध व्यापारी हरजीवन फुलचंद शेट यांचे बुधवार दि. २१ जानेवारी रोजी त्यांच्या घरी माणगाव येथे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले,एक मुलगी,जावई,सुना,नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर माणगाव येथील स्मशानभूमीत गुरुवार दि.२२ जानेवारी रोजी सकाळी ८ वा. अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा उत्तरकार्य विधी तेरावे रविवार दि.१ फेब्रुवारी २०२६ रोजी राहते घरी माणगाव येथे होणार असल्याचे त्यांचे सुपुत्र बच्चूभाई हरजीवन शेट यांनी सांगितले.

### ठकुबाई मुंबईकर



**उरण :** तालुक्यातील वेश्वी गावचे सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर यांच्या मातोश्री स्व. ठकुबाई बळीराम मुंबईकर यांचे सोमवार दिनांक १९ जानेवारी रोजी वयाच्या ८० व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात त्यांचे पाच मुलगे, सुना, नातवंडे, पंतवंडे असा मोठा गोतावळा आहे त्यांची होम विधी शुक्रवार दिनांक २३ जानेवारी रोजी तर दशक्रिया विधी बुधवार दिनांक २८ जानेवारी रोजी श्री क्षेत्र माणकेश्वर उरण येथे होणार आहे आणि उत्तरकार्य विधी शुक्रवार दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या राहत्या घरी उरण – वेश्वी येथे होणार आहे.

### मारुती खरडे



**नागोठणे :** मारुती यादवराव खरडे (वय ७५) यांचे गुरुवार दिनांक १५ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. नागोठण्यातील बांधकाम व्यावसायिक दत्ता खरडे यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात एक विवाहित मुलगी, दोन मुलगे, जावई, सुना, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे .त्यांचा दशक्रिया विधी शनिवार २४ जानेवारी रोजी उद्धर(ता.सुधागड) येथे तर उत्तरकार्य मंगळवार २७ जानेवारी रोजी नागोठण्यातील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती खरडे कुटुंबियांकडून देण्यात आली.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये शेकापला धक्का!

एकेकाळी पनवेल तालुक्यात भक्कम संघटन असलेल्या शेतकरी कामगार पक्षाने काँग्रेस व शिवसेना (महाविकास आघाडी) यांच्यासोबत आघाडी केल्याने पक्षाची स्वतंत्र ओळख धूसर झाली आहे. शेकापला स्वतःच्या ताकदीवर राजकारण करण्याऐवजी इतर पक्षांच्या कुबड्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याने पक्षातील अनेक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व अस्वस्थता वाढली आहे. याच कारणामुळे शेकापला सातत्याने गळतीचा सामना करावा लागत आहे. दुंदरे येथील उसाटकर कुटुंबियांसह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने शेकापला दणका बसला आहे.

# पनवेल, उरणमध्ये माघी गणेशोत्सव उत्साहात

## चिरनेर महागणपतीला गर्दी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात माघी गणेश जयंती निमित्ताने काल गुरुवारी २२ जानेवारी रोजी लाखो भाविकांनी प्राचीन जागृत पेशवेकालीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे ३:३० वाजता मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले.

या वेळी प्रथम श्री महागणपतीचा अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर श्रींच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाचा जयघोष करीत भक्तीमय वातावरणात श्रींचे दर्शन घेतले. या वेळी हजारो गणेश भक्तांनी श्रींच्या जन्मोत्सवाच्या कीर्तनातून, श्रवण सुखाचा लाभ घेतला. त्यानंतर दुपारी महाप्रसादाला सुरुवात झाली.

या महाप्रसादाचा समस्त चिरनेर गावकऱ्यांनीच नव्हे तर आजूबाजूच्या गावातील गावकरी आणि राज्यातील अनेक भागातून आलेल्या भाविकांनी देखील लाभ घेतला. श्री महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन व जागृत असून, येथील श्रींच्या दर्शनासाठी मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे, डोंबिवली, कल्याण, उरण, पनवेल, पेण तसेच राज्याच्या अनेक भागातून, आलेल्या लाखो भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली होती. चिरनेर गावातील माघी गणेशोत्सव हा प्रचंड मोठ्या प्रमाणावर होत असल्याने, संपूर्ण चिरनेर गाव भाविक भक्तांनी फुलून निघाले होते.

भक्तगणांची गैरसोय होऊ नये, सर्वांना सुखकर सोयी सुविधा मिळून, रांगेत दर्शन घेता यावे, वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी चिरनेर गणपती देवस्थान प्रशासनाकडून कडक बंदोबस्त आणि आवश्यक सुसज्ज नियोजन करण्यात आले होते. उत्सवानिमित्त चिरनेरच्या नागरिकांनी भक्तांच्या स्वागतासाठी जागोजागी स्वागत फलक उभे केले होते. तसेच विविध महत्त्वाच्या ठिकाणी स्वागत कमानी देखील उभारल्या होत्या. श्रींच्या दर्शनासाठी आलेल्या गणेश भक्तांच्या अफाट गर्दीमुळे चिरनेरच्या पावन तीर्थात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.





पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांनी न्हावेखाडी येथील मंदिरात श्री गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



नवीन पनवेल : येथील किरण माहुलकर यांच्या घरी माघी गणेश जयंतीनिमित्त विराजमान बाप्पा.




उरण : मोठी जुईचा राजा सार्वजनिक माघी गणेशोत्सवाच्या वतीने पाच दिवसांसाठी प्रतिष्ठाना करण्यात आलेली शिव अवतारातील गणरायाची तांडव नृत्य करणारी भव्य गणेशमूर्ती.

## रांजणपाडा येथे गणरायाची पूजा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माघी गणपती निमित्त पंडित उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांच्या वतीने रांजणपाडा (खारघर) येथे भव्य गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या पवित्र सोहळ्यासाठी परिसरातील तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. हजारो भाविकांनी श्री गणरायाचे दर्शन घेऊन मनोभावे पूजाअर्चा केली.

या गणेशोत्सवाच्या काळात संपूर्ण रांजणपाडा परिसर भक्तिमय वातावरणाने नटला होता. भक्तांसाठी दर्शनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. तसेच दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे चौधरी कुटुंबीयांच्या वतीने आदरपूर्वक स्वागत करण्यात आले. भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. माघी गणपती हा भक्तांच्या श्रद्धेचा आणि विश्वासाचा केंद्रबिंदू असून, या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवामुळे सामाजिक एकोपा आणि भक्तिभाव अधिक दृढ झाला.

या उत्सवानिमित्त नवदुर्गा महीला प्रासादिक भजन मंडळ कोपरा, आणि हनुमान प्रासादिक भजन मंडळ पळस्पे यांचे भजन, प्रख्यात सितारवादक पं.मारूती पाटील यांचे सतारवादन तसेच पं.उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन कार्यक्रमे आयोजित करण्यात आली होती. गणेशोत्सव यशस्वी होण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ, स्वयंसेवक आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे पंडित उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांनी आभार मानले.



## एटीएमची अदलाबदल करून ५२ हजारांची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एटीएम कार्डची अदलाबदली करून ५२ हजार २२ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २० जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

साधना बोहरा या तक्का गाव येथे राहत असून २० जानेवारी रोजी त्या रोख रक्कम काढण्यासाठी घरातून पायी निघाल्या. त्या रेल्वे स्टेशन जवळील एटीएम मध्ये गेल्या. पैसे काढण्यासाठी एटीएम टाकला असता दोन अनोळखी ईसम आले आणि एटीएम खराब आहे असे बोलून त्यांनी एटीएम कार्ड हातातून घेतले. आणि नकळत एटीएम कार्डची अदलाबदली करून त्याच्याजवळील एटीएम कार्ड बोहरा यांना दिले. आणि तेथून तो निघून गेला. त्यानंतर त्यांनी ओळखीच्या व्यक्तीला एटीएम देऊन पैसे काढण्यास सांगितले, मात्र एटीएममधून पैसे आले नाहीत.

या वेळी त्यांच्या मोबाईल नंबर वर पैसे विड्रॉल झाल्याचे मेसेज आले. त्यानंतर बँकेत जाऊन त्यांनी स्टेटमेंट काढून पाहिले असता ५२ हजार २२ रुपये विथड्रॉल झाल्याचे दिसून आले.

## वणव्यांमुळे निसर्गाचा ऱ्हास

### संतोष शिंगाडे यांच्याकडून जनजागृती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जानेवारी महिना सुरू झाला की ठिकठिकाणी वणवा लागण्याच्या घटना घडत असल्याचे दिसून येते. रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरापासून काही अंतरावर असणाऱ्या दुर्गम सवणे, काळीवली, सारसई या डोंगर भागात वणवा लागण्याच्या घटना घडत असल्याने सारसई धनगरवाडावतील सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंगाडे यांनी जनजागृती सुरु केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वणवा फक्त झाडे जाळत नाही, तर त्यासोबत पशू-पक्ष्यांची घरटी, भविष्यातील सावली आणि मुक्या प्राण्यांचा घासही जाळून खाक करतो.

झाड लावायला अनेक वर्षे लागतात, पण ते जाळायला एक काडी पुरेशी असते. सृष्टीचा संहार थांबवा, वणवा लावणे टाळा!अशी गावोगावी फिरून जनजागृती संतोष शिंगाडे करत असल्याचे दिसून येते. गाई-म्हशींचा चारा जळतो, पक्ष्यांची पिल्ले राख होतात; माणसाच्या एका चुकीमुळे निसर्गाचे लेकुरवाळे अनाथ होतात.

निसर्ग हा आमचा श्वास आहे, त्याला आगीच्या हवाली करू नका. हिरवाई जपा, भविष्य वाचवा. निसर्गाची राख अन् मुक्या जीवांचा आक्रोश: वणवा रोखणे हीच काळाची गरज! वणव्यामुळे डोंगरावरील गवत जळून जाते, ज्यामुळे गाई-गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होतो. जैवविविधतेचा ऱ्हास दुर्मीळ औषधी वनस्पती आणि सरपटणारे प्राणी आगीत नष्ट होतात.

मानवी आरोग्यावर परिणाम: वणव्याच्या धुरामुळे प्रदूषणात वाढ होऊन मानवी श्वसनाचे विकार वाढतात. अपील: समाजाने सतर्क राहून वणवा लावणाऱ्या प्रवृत्तींना आळा घातला पाहिजे आणि निसर्गाचे रक्षण ही आपली जबाबदारी मानली पाहिजे, असे सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंगाडे यांनी आवाहन केले आहे.

## उरणमधील गणपती मंदिरांत विविध धार्मिक कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

माघी श्री गणेश जयंती निमित्ताने गुरुवारी (दि. २२) उरण तालुक्यातील गणेश मंदिरात उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली तय निमित्ताने ठिक-ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

उरण तालुक्यातील चिरनेर, सोनारी, केगाव विनायक येथील रिद्धि-सिद्धि विनायक मंदिर, बोकडविरा गणेश मंदिर, उरण शहरातील गणपती मंदिर येथे मोठ्या उत्साहात गणेश जयंती साजरी करण्यात आली. श्री गणेश जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले



बोकडविरा येथील श्री गणपती देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने मंगळवार (दि. २०) श्री गणेश मंदिरचे नुतनीकरण करण्यात आले. श्रींच्या मूर्तीवर जल अभिषेक, होम, हवन, मंदिराचे उद्घाटन करण्यात आले. बुधवारी (दि.२१) रोजी मंदिराचा २१वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सकाळी ६ ते ८ धार्मिक विधी, भजन, महाप्रसाद, ज्ञानेश्वर हरीपाठ, रात्री संसृतिक कार्यक्रम व गावातील गुणवंत विद्यार्थी यांचा यांचा गुणगौरव व बक्षीस समारंभ करण्यात आला. गुरुवारी (दि. २२) रोजी पाहुण्यांचे स्वागत, गणेश जयंती सोहळा, पालखी उत्सव अश्या प्रकारचे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ग्राम सुधारणा मंडळ बोकडवीरा, (गणेशपूर) चे अध्यक्ष सुर्यकांत पाटील, सेक्रेटरी श्रीकांत पाटील, सर्व कार्यकारी मंडळ, श्री गणपती देवस्थान ट्रस्ट, ग्रामपंचायत बोकडवीरा, जेष्ठ ग्रामस्थ संघटना, श्री गजानन प्रासादिक भजन मंडळ, मंदिराचे ट्रस्टी यांचे सहकार्य मिळाले, असे सेक्रेटरी श्रीकांत पाटीलयांनी सांगितले.

केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक येथील श्री रिद्धीसिद्धी मंदीर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, असे मंदिराचे ट्रस्टी सौरभ घरत यांनी सांगितले.

## 'सीकेटी'चे माजी विद्यार्थी भरत चौधरींची न्यूयॉर्कमधील संशोधन संस्थेत निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी भरत स्वरूपम चौधरी यांची न्यू जर्सी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, न्यूयॉर्क (अमेरिका) येथे पोस्ट डॉक्टरल रिसर्च असोसिएट (संशोधन सहाय्यक) म्हणून निवड झाली आहे. ते येत्या १ फेब्रुवारीपासून आपल्या नवीन पदावर रुजू होणार आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल भरत स्वरूपम चौधरी यांचा आज महाविद्यालयात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



भरत चौधरी यांनी चांगू काना ठाकूर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातून बी.एस्सी. पदवी प्राप्त केली असून मुंबई विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला होता. त्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठातून ऑरगॅनिक केमिस्ट्री या विषयात एम.एस्सी. पूर्ण करत नेट-जेआरएफ ही राष्ट्रीय पात्रता (AIR-42) सन्माननीय यश मिळवत प्राप्त केली. भरत चौधरी यांना एम.एस्सी. त्यांच्या शिक्षणासाठी आदरणीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संपूर्ण आर्थिक सहाय्य केले होते.

पुढे त्यांनी २०१९ ते २०२५ या कालावधीत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IISER), पुणे येथे आपले पीएच.डी चे शिक्षण पूर्ण केले. 'स्टिम्युली रिस्पॉन्सिव्ह लैक्टोनायझेशन बेस पर्सल्फाइड जनरेटर हा त्यांचा संशोधनाचा विषय होता. 'लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांचे पाठबळ आणि सीकेटी महाविद्यालयातील अध्यापक वर्गाचे मार्गदर्शन लाभल्यामुळेच आपल्याला शैक्षणिक क्षेत्रात अशी उत्तुंग भरारी घेता आली. असे नमूद करत भरत चौधरी यांनी रामशेठ ठाकूर साहेबांचे तसेच महाविद्यालय व्यवस्थापनाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. संशोधन क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी करणाऱ्या भरत चौधरी यांच्या या आंतरराष्ट्रीय यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेला आणखी एक गौरवशाली पान लाभले आहे.

## दोन लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जुन्या मशीन पावडर कोटिंग करून देतो असे सांगून दोन लाख ३४ हजार रुपये रोखीने आणि ऑनलाईन स्वीकारून नवीन आणि कोटिंग केलेल्या मशीन न देता फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी प्रशोध पाणीकर आणि यामिनी पाणीकर (रा. एनआरआय कॉम्प्लेक्स, सिवूड) यांच्या विरोधात २० जानेवारी रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अल्ताफ पठाण हे खारघर सेक्टर ४० येथे राहत असून ते नवीन जिमच्या साहित्याच्या शोधात होते. प्रशोध पाणीकर यांच्यावर त्यांनी फोनवर बोलणे केले. यावेळी जुन्या पंधरा मशीनपैकी सात मशीन बदलून नवीन देणार आणि उर्वरित आठ मशीन पावडर कोटिंग करून देणार असल्याचे ठरले.

या वेळी बिग बॉय फिटनेस नावाची कंपनी असल्याचे खोटे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला आणि दोन लाख ३४ हजार ४०० रुपये रोखीने आणि ऑनलाईन स्वीकारले, मात्र नवीन मशीन तसेच पावडर कोटिंग केलेल्या मशीन न देता फसवणूक केली.

## मुलाच्या गळ्यातील सोने चोरले

**पनवेल :** पाच वर्षीय मुलगा खेळत असताना त्याच्या गळ्यातील काळा धागा कापून सोन्याचे पान चोरून नेल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात २० जानेवारी रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुनील डोंबाळे हे कळंबोली, सेक्टर एक येथे राहत असून त्यांचा पाच वर्षीय मुलगा हा घरासमोर गल्लीत खेळत होता. या वेळी अनोळखी व्यक्तीने त्याच्या गळ्यातील काळा धागा कापला आणि त्यातील साडेचार हजार रुपयांचे सोन्याचे पान चोरून नेले.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त सीकेटी विद्यालयात विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सी.के.टी. विद्यालयाच्या इंग्लिश मीडियम पूर्व प्राथमिक विभागातर्फे देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून गुरुवारी (दि.२२) विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळांतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा, तसेच राष्ट्रीय स्तरातील रेम्बो आर्टतर्फे आयोजित चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचबरोबर शिक्षकांना प्रमाणपत्र, मेडल देऊन गौरविण्यात आले.




एक सुजाण नागरिक बनून आपआपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या समजून घ्यायच्या आहेत आणि त्याचबरोबर देशाच्या विकासासाठी योगदान द्यायचे आहे, असे प्रतिपादन नवनिर्वाचित नगरसेविका अस्मिता घरत यांनी केले.

आपल्या स्वातंत्र्य सैनिकांनी, क्रांतिकारकांनी आणि अनेक महान व्यक्तींनी आपल्या प्राणांची आहुती देऊन आपल्याला हे स्वातंत्र्य आणि प्रजासत्ताक मिळवून दिले. देशाला मजबूत करायचे असेल, तर चांगले शिक्षण घेवून चांगले नागरिक व्हा, भेदभाव दूर करा आणि सर्वांना समान संधी द्या, असे मार्गदर्शनपर विचार शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी पनवेल महापालिकेच्या नव निर्वाचित नगरसेविका डॉ. अस्मिता जगदीश घरत, तसेच सीकेटी विद्यालय मराठी माध्यम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर तसेच इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधूरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी उपस्थित होत्या.

सूत्रसंचालन व आभार दिपाली आमले, गीता जगताप व मेघा खुजे यांनी मानले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## उरण येथे आज मुंबई विद्यापीठाचा उडान महोत्सव

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय उरण व उरण एज्युकेशन सोसायटीचे मॅनेजमेंट आणि टेक्नॉलॉजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठाच्या अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित उडान महोत्सव २०२६ हा शुक्रवारी (दि.२३) होणार आहे.

विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना व गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी उडाण महोत्सवाचे आयोजन विद्यापीठाच्या वतीने करण्यात येते. या महोत्सवात पोवाडा गायन, पथनाट्य, पोस्टर मेकिंग, वक्तृत्व आणि क्रिएशन रायटिंग या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाच्या अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाचे संचालक डॉ. बळीराम एन.गायकवाड यांच्या हस्ते होणार आहे.

या वेळी यूईएस महाविद्यालयाचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, कोकण ज्ञानपीठ संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश मुथा, प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे, प्राचार्या डॉ. मीनाक्षी गुप्ता, मिलिंद पाडगावकर इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवाच्या आयोजनासाठी महाविद्यालयातील अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा.व्हि.एस. इंदुलकर हे परिश्रम घेत आहेत.या महोत्सवात उत्तर रायगड जिल्हा व नवी मुंबई परिसरातील एकूण २५ महाविद्यालयातील ३५० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणार आहेत. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.रवींद्र कुलकर्णी यांनी या महोत्सवास शुभेच्छा दिल्या आहेत. हा महोत्सव यूईएस महाविद्यालयाच्या परिसरात होणार आहे.

## संपादकीय

# महिला राज

महाराष्ट्रात आता तब्बल १५ महिला महापौर होणार आहेत. त्यामुळे राज्यात आता महिला राज पहायला मिळणार असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर या चारही मोठ्या शहरांचा यात समावेश आहे.

**नुकत्याच निवडणुका पार पडलेल्या अनेक महापालिकांमध्ये एकीकडे सत्तास्थापनेकरिता राजकीय नाट्य रंगत असताना दुसरीकडे महापौरपदाची सोडत हादेखील गेले काही दिवस चर्चेचा विषय ठरला होता. अखेर गुरूवारी मुंबईसह राज्यभरातील २९ महापालिकांच्या महापौरपदाची सोडत जाहीर झाली. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली महापौरपदाची आरक्षणाची सोडत काढण्यात आली. यात ५० टक्के आरक्षणाच्या धोरणामुळे निम्म्या महापालिकांचे नेतृत्व महिलांकडे गेले आहे. पुढील अडीच वर्षांसाठी ही सोडत काढण्यात आली असून २९ महापालिकांपैकी १५ महापालिका विविध प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. महापालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर जवळपास आठवडाभराने हे आरक्षण जाहीर झाले. त्यामुळेच त्याविषयी गेले काही दिवस चर्चा होत होती. मुंबई, पुणे आणि नागपूरसह १५ शहरांत आता महिला राज पहायला मिळणार आहे. ५० टक्के महिला आरक्षण धोरणामुळे काही महापालिकांमध्ये दिग्गज पुरूष नेत्यांची कोंडी झाली आहे खरी. पण राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे वर्चस्वही यातूनच अधोरेखित होणार आहे. राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर या चारही मोठ्या शहरांमध्ये सर्वसाधारण महिला आरक्षण जाहीर झाले आहे. यामुळे राज्यातील प्रमुख शहरांच्या विकासाची सूत्रे आता महिलांच्या हाती असतील. मुंबईनजीकच्या नवी मुंबई, मिरा-भाईंदर या महापालिकांमध्येही 'सर्वसाधारण महिला आरक्षण'असणार आहे. महिलांच्या या वाढत्या राजकीय सहभागाचे स्वागतच करावे लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आधी महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाले. पुढे ते ५० टक्के इतके करण्यात आल्यामुळे महिला राजकारणात मोठ्या प्रमाणात सक्रीय झाल्या. आधी चूल आणि मूल या चौकटीत अडकून पडलेल्या स्त्रिया या शिक्षणाची दारे खुली झाल्यानंतर नोकरी-व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणावर घराबाहेर पडू लागल्या. परंतु राजकारण हा प्रांत मात्र स्त्रियांकरिता नसल्याची मानसिकताच दीर्घकाळ कायम राहिली. अखेर आरक्षणातूनच हलकेहलके हे चित्र बदलू लागले. ग्रामीण भागात साध्यासुध्या भासणाऱ्या स्त्रिया ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद स्तरावर कामातून आपला ठसा उमटवू लागल्या. स्थानिक पातळीवरील प्रश्नांकडे बघण्याचा स्त्रियांचा दृष्टीकोन निश्चितच निराळा, अधिक संवेदनशील असल्याचे स्पष्ट झाले आहे. महिला बचत गट, दारूबंदी यासारख्या बाबींकडे त्यांनी प्राधान्याने लक्ष दिले आहे. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणूनच की काय मतदार म्हणूनही स्त्रियांची जागरूकता वाढतच गेली आहे. अर्थात शहरांमधली परिस्थिती मात्र काहीशी निराळी असते. येथील प्रश्नांचे स्वरूपही अधिक आव्हानात्मक असल्यामुळे काही अंशी येथील महिला प्रतिनिधी आजही काही प्रमाणात पुरूष लोकप्रतिनिधींवर मार्गदर्शनासाठी अवलंबून असतात असे दिसते. शहरांमध्ये वाहतूक समस्या, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, रस्त्यांची दुर्दशा यांसारख्या प्रश्नांवर समाधानकारक तोडगा काढणे वाढत्या लोकसंख्येच्या रेट्यामुळे सातत्याने आवाक्याबाहेरचे व आव्हानात्मक रहाते. काही प्रमाणात भ्रष्टाचार, नोकरशाही हेही अडथळे ठरतात. या साऱ्या अडथळ्यांवर मात करून समर्थपणे जबाबदारी पार पाडण्याचे कौशल्यही महिला लोकप्रतिनिधी आत्मसात करत चालल्या आहेत. आरक्षणाच्या आधाराविना महिलांनी राजकारणात येण्याचे मोठे आव्हान मात्र आजही तसेच कायम आहे, परंतु अनेक महिला लोकप्रतिनिधी आपल्या कर्तबगारीने वेगळा ठसा उमटवताना दिसत आहेत.**

# जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी मार्गदर्शक सूचना जारी

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-२०२६ जाहीर करण्यात आला असून या कालावधीत काय करावे व काय करु नये याबाबतची मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

याप्रमाणे चालू असलेले कार्यक्रम, योजना पुढे सुरु ठेवता येतील. ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, राज्य निवडणूक आयोग,महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण, मान्यता प्राप्त करण्यात यावी. पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व या संदर्भात चालू असलेल्या योजना पुढे सुरु ठेवता येतील. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समुचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना, निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निः पक्षपातीपणे उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना, निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडच्या वापर निः पक्षपातीपणे उपलब्ध करुन दिला पाहिजे. विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्या अनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशास संपूर्णतः अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर उपलब्ध करुन देता येणे अनुज्ञेय असल्यास त्याप्रमाणे देण्यात यावेत. इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात येणारी टीका ही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे, केवळ या बाबींशी संबंधित असावी. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्त्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविण्यात याव्यात. प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिक्षेपक किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे. कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभीची वेळ व जागा, मिरवणूक ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मिरवणुकीची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मिरवणूक ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्या विषयी खात्री करुन त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे.

याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे. मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मिरवणुकीत सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत. उमेदवार व त्याच्या अधिकृत कार्यकत्यांनी विहित परवानगी घेऊन योग्य असे बिल्ले व ओळखपत्रे, निवडणूक प्रशासनाकडून मिळवावीत व ती निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ती दर्शनी भागावर लावावीत. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठया साध्या (पांढऱ्या) कागदावर देण्यात येतील व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव यांचा निर्देश असणार नाही. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. राज्य निवडणूक आयोगाचे, अथवा जिल्हाधिकाऱ्यांचे किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेले वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याहीवेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना यांनाही यातून सूट देण्यात आलेली नाही.

निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी/क्षेत्र/प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. राज्य निवडणूक आयोग आयुक्त, महानगरपालिका/जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबींविषयीचे निर्देश/ आदेश/अनुदेश यांचे पालन करण्यात यावे.

**काय करू नये**

शासकीय वाहने किंवा कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये. शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनाचा समावेश असेल:- केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, पणन मंडळ (कोणत्याही नावाचे), सहकारी संस्था, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या/ग्रामपंचायती, ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिश्यातील कितीही अल्पांशाने असो गुंतवण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था व संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय, राज्य शासन, केंद्रीय पोलिस संघटना इत्यादीच्या मालकीची असलेली पुढील वाहने-मालमोटारी, लॉरी, टेंपो, जीपगाड्या, मोटारगाड्या, ऑटोरिक्षा, बसगाड्या, विमाने, हेलिकॉप्टर, जहाजे, बोटी, हॉवर क्रॉफ्ट व इतर सर्व वाहने. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दीष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये. कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषण करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करु नयेत.

शासन/सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ नियुक्त्या करु नयेत. मंत्री (राज्यमंत्री व उपमंत्रीसहित) हे उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत. निवडणूक मोहिम/प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी काम पार पाडण्यात येऊ नये. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये. मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करण्यात येऊ नये. विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये. इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसेल अशा त्यांच्या खाजगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादी साठी कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर करण्यात येऊ नये. लाच देणे, आवजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचविणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक विषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहेत. व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नये. कोणत्याही व्यक्तीला, अन्य कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत आवारभिंत इत्यादींचा वापर त्यांच्या मालकांच्या परवानगीखेरीज करणे, ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीशी चिकटविणे किंवा घोषणा लिहिणे इत्यादी करता येणार नाही. यामध्ये शासकीय, सार्वजनिक व खाजगी जागांचा समावेश असेल. एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे मिरवणूक काढण्यात येऊ नये. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठया वितरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षाजवळ प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये. ध्वनिक्षेपकांचा सकाळी ६ वाजण्यापूर्वी किंवा रात्री १० वाजल्यानंतर लेखी पूर्वपरवानगी घेतलेली असल्याखेरीज वापर करु नये. अशा सभा/प्रचारफेरी रात्री १० वाजल्यानंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या पैशाचे, मद्याचे, वस्तूंचे वाटप करण्यात येऊ नये.

**-मनोज सानप**
जिल्हा माहिती अधिकारी
रायगड-अलिबाग



## बदलते तंत्रज्ञान

# सॅमसंगने बनवला सर्वात मोठा टीव्ही

जगातील सर्वात मोठ्या टेक शो 'CES २०२६'च्या सुरुवातीपूर्वी सॅमसंगने लास वेगासमध्ये जगातील सर्वात मोठा १३० इंचाचा मायक्रो RGB टीव्ही सादर केला आहे. याचा आकार इतका मोठा आहे की तो सांभाळण्यासाठी कंपनीने एक मोठा मेटल स्टँड देखील सोबत दिला आहे.विशेष म्हणजे, या स्टँडच्या मदतीने स्क्रीन थोडी झुकवता येते. ही डिझाइन सॅमसंगच्या २०१३च्या 'टाइमलेस गॅलरी' स्टँडची आठवण करून देते.



तथापि, कंपनीने स्पष्ट केले आहे की सध्या हे एक 'संकल्पना' मॉडेल आहे, म्हणजेच ते सध्या बाजारात आणले जाणार नाही.

OLEDसारखी स्पष्टता आणि उत्तम ब्राइटनेससॅमसंगचा हा टीव्ही मिनी एलईडी तंत्रज्ञानाचेच एक प्रगत रूप आहे. यात रंग आणि कॉन्ट्रास्टची अचूकता खूप जास्त आहे. हे रंग अधिक गडद आणि नैसर्गिक दाखवते.हा टीव्ही थेट भिंतीवरही टांगता येतो, परंतु त्याचा खास स्टँडही भिंतीवरच लावावा लागेल, कारण टीव्हीची स्पीकर सिस्टीम त्याच स्टँडमध्ये बसवलेली आहे.

**एआय अस्पष्ट प्रतिमांनाही चमकदार बनवेल**

सॅमसंगने या टीव्हीमध्ये 'मायक्रो RGB AI इंजिन प्रो' प्रोसेसर वापरला आहे. यात असलेली 'कलर बूस्टर प्रो' आणि 'HDR प्रो' तंत्रज्ञान एआयच्या मदतीने फिक्या रंगांना अधिक चांगले बनवते. हे अंधार आणि प्रकाशातील दृश्यांमधील सूक्ष्म फरक स्पष्टपणे दाखवते. टीव्हीची स्क्रीन 'ग्लेअर फ्री' देखील आहे. म्हणजे यावर प्रकाशाचे परावर्तन (चमक) पडत नाही.सर्चसाठी मायक्रोसॉफ्ट को-पायलट आणि व्हिजन एआय चा सपोर्ट या टीव्हीमध्ये केवळ चांगली पिक्चरच नाही, तर अनेक स्मार्ट फीचर्स देखील दिले आहेत.

शोध : यात संवादाद्वारे शोध घेण्यासाठी सॅमसंगचा 'व्हिजन एआय कंपेनियन' दिला आहे.

भागीदारी: टीव्हीसोबत मायक्रोसॉफ्ट को-पायलट आणि परप्लेक्सिटीसारखे एआय मिळतील.

ध्वनी : उत्तम ऑडिओ अनुभवासाठी यात कंपनीचे 'एक्लिप्सा ऑडिओ' तंत्रज्ञान आहे.

किंमत लाखांमध्ये असण्याचा अंदाज आहे

# देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस

भारतीय राष्ट्रवादी सुभाषचंद्र बोस यांच्या देशभक्तीने अनेक भारतीयांवर कायमची छाप सोडली आहे. ते आझाद हिंद फौज या संघटनेची स्थापना करण्यासाठी प्रसिद्ध राहिले आहेत आणि तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दुंगा अशी त्यांची घोषणा सर्वांना माहीत आहे.

मुक्ती सेनानी, सुभाषचंद्र बोस यांच्याकडे अपवादात्मक नेतृत्व गुण होते आणि ते एक करिष्माई वक्ते होते. त्यांनी आझाद हिंद फौज स्थापन केली आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात अनेक योगदान दिले. ते त्यांच्या समाजवादी धोरणांसाठी तसेच स्वातंत्र्य मिळवण्यासाठी वापरलेल्या सशक्त रणनीतींसाठी प्रसिद्ध आहे.



**निमित्त**

प्रभावती दत्त बोस आणि जानकीनाथ बोस यांचे पुत्र, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी कटक, ओडिशा येथे झाला. त्याने कटक येथील प्रोटेस्टंट युरोपियन शाळेत शिक्षण घेतले, जे आता स्टीवर्ट हायस्कूल आहे. प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

वयाच्या १६व्या वर्षी सुभाषचंद्र बोस यांचे लेखन वाचल्यानंतर स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण यांच्या शिकवणींचा त्यांच्यावर प्रभाव पडला. त्यानंतर भारतीय नागरी सेवेची तयारी करण्यासाठी त्यांच्या पालकांनी त्यांना इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात पाठवले. १९२०मध्ये त्यांनी नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण केली, परंतु एप्रिल १९२१मध्ये भारतातील राष्ट्रवादी गदारोळ ऐकल्यानंतर त्यांनी उमेदवारीचा राजीनामा दिला आणि भारतात परतले.

भगवद्गीतेचा सुभाषचंद्र बोस यांच्यावर प्रभाव होता आणि त्यांनी ते इंग्रजांविरुद्धच्या लढ्यासाठी प्रेरणास्रोत म्हणून पाहिले. लहानपणापासूनच त्यांच्यावर स्वामी विवेकानंद यांच्या वैश्विक आणि राष्ट्रवादी विचारांचा खूप प्रभाव होता. त्यांनी 'स्वराज' वृत्तपत्राची स्थापना केली.

सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळी बोस बंगालच्या क्रांतिकारक गटाशी संबंध ठेवल्याबद्दल नजरकैदेत होते. तुरुंगात असताना ते कलकत्त्याचे महापौर झाले. त्यानंतर त्यांना सोडण्यात आले आणि क्रांतिकारी गटांशी संबंध असल्याच्या संशयावरून अनेक वेळा ताब्यात घेण्यात आले. शेवटी तब्येत खराब असल्याच्या कारणास्तव त्यांना सोडण्यात आले १९३६मध्ये ते युरोपमधून परतले आणि सुमारे एक वर्ष नजरकैदेत राहिले.

सुभाषचंद्र बोस यांनी १९४१मध्ये नजरकैद टाळली आणि वेश परिधान करून भारत सोडला. अडॉल्फ हिटलर त्यांना भेटला आणि त्यांना नाझी जर्मनीकडून पाठिंबा मिळू लागला. त्यांनी बर्लिनमध्ये फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली आणि भारतीय सैन्याची भरती केली,

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूरमध्ये स्वतंत्र भारताच्या तात्पुरत्या प्रशासनाची (आझाद हिंद) स्थापना करण्याची घोषणा केली.

अंदमानमध्ये, सुभाषचंद्र बोस १८ ऑगस्ट १९४५ रोजी एका विमान अपघातात मरण पावले, ते तैवानमार्गे टोकियोला जात होते. १८ ऑगस्ट १९४५ रोजी तैपेह, तैवान (फॉर्मोसा) येथे विमानाच्या धडकेत ते ठार झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सकाळी उठल्यावर न चुकता करा या गोष्टी

रोज सकाळी उठल्यावर छान फ्रेश आणि एनर्जेटीक वाटावे अशी आपली इच्छा असते. मात्र काही ना काही कारणाने आपल्याला सकाळी उठल्यावर डाऊन वाटते. कधी झोप पूर्ण झाली नाही म्हणून, तर कधी आरोग्याच्या काही तक्रारींमुळे इतर ताणतणाव यांसारख्या गोष्टींमुळे सकाळी उठल्यावर फ्रेश वाटत नाही, पण सकाळी फ्रेश वाटलं नाही तर आपला पूर्ण दिवस आळसात आणि कंटाळवाणा जातो. असं होऊ नये आणि सकाळी उठल्यापासून आपल्याला फ्रेश वाटावं यासाठी उठल्यावर काही गोष्टी करणं आवश्यक असतं. प्रसिद्ध आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. हंसाजी योगेंद्र सकाळी उठल्यावर काय करावं याबाबत तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगतात. मॉर्निंग रुटीनमध्ये या गोष्टींचा समावेश केल्यास दिवस छान जायला मदत होईल.



**प्राणायमाचे महत्त्व**

आपण दिवसभर श्वास घेत असतो, पण त्या श्वासाकडे आपण लक्ष देतोच असं नाही, मात्र सकाळच्या वेळी लक्षपूर्वक श्वासावर लक्ष दिल्यास त्याचा आपल्या दिवसावर अतिशय सकारात्मक परीणाम होतो. श्वासाशी निगडीत विविध प्राणायाम प्रकार केल्याने दिवस चांगला जाण्यास मदत होते. आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर या प्राणायमाचा चांगला परीणाम होतो.

**नाश्त्याबाबत लक्षात ठेवा**

सकाळी उठल्यावरचे पहिले खाणे म्हणजेच नाश्ता आपल्या आहारातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट असते. हा नाश्ता शरीराला पोषण देणारा असेल तर आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. नाश्ताला आहारात प्रोटीन्स म्हणजेच प्रथिने असल्यास पोट भरण्यास, स्नायू बळकट होण्यास आणि प्रतिकारशक्ती चांगली राहण्यास मदत होते. दिवसभर ऊर्जा टिकून राहण्यास आणि रक्तातील साखरेचे प्रमाण योग्य राहण्यासही प्रोटीन महत्त्वाचे असते. यामध्ये शाकाहारी पदार्थांतील डाळी, पनीर, चीज, कडधान्य यांचा समावेश होऊ शकतो. यात भाज्या आणि धान्यांचा समावेश केल्यास हे पदार्थ जास्त पोषण देणारे ठरतात.

**सूर्यप्रकाश अंगावर घेणे**

सूर्यप्रकाश हा आपल्या एकूण आरोग्यासाठी अतिशय आवश्यक गोष्ट असते. सकाळच्या वेळी झोपेचे वेळापत्रक चांगले ठेवण्यासाठी, व्हिटॅमिन डी मिळण्यासाठी आणि दिवसभरासाठीची ऊर्जा टिकून राहण्यासाठी सूर्यप्रकाश अतिशय गरजेचा असतो.

# भाजप महायुतीवरील जनतेच्या विश्वासामुळे आमचा विजय निश्चित -वैकुंठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

सर्वसामान्य जनतेचा भाजप महायुतीवरील विश्वासामुळे विजय निश्चित असल्याचे भाजप महामंत्री वैकुंठ पाटीलयांनी सांगितले. दादर जिल्हा परिषद मतदार संघातून त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप, राष्ट्रवादी काँगेस व मित्रप पक्ष महायुतीचे उमेदवार वैकुंठ पाटील यांच्यासहित महायुतीच्या उमेदवारांनी शेवटच्या दिवशी शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत आमदार रविशेठ पाटील, माजी जि.प. सदस्य



कौसल्याताई पाटील, पत्नी शर्मिला पाटील, तसेच आदिनाथ पाटील, व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना वैकुंठ पाटील यांनी सांगितले कि, विकास कामांचा मुद्दा घेऊन भारतीय जनता पक्षाचे उमेदवार या निवडणुकीत उतरले असून या मतदार संघात खासदार धैर्यशिल पाटील, आमदार रविशेठ पाटील व खासदार सुनीलजी तटकरे यांच्या माध्यमातून विकासकामांची घोडदौड सुरु असून या जोरावर भाजप कार्यकर्ते मोठ्या मताधिक्क्याने बाजी मारतील अस आत्मविश्वास वैकुंठ पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी शर्मिला पाटील यांनी शिहू जि. प. मतदार संघातून, वडखळ जि. प. मतदार संघातून प्रभाकर म्हात्रे, जिते जि.प. मतदार संघातून ताई जोमा दरवडा आदींसहित पंचायत समितीसाठी भारतीय जनता पक्ष महायुतीच्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

# अलिबाग तालुक्यात दोन अर्ज अवैध, १५० वैध

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि अलिबाग पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अलिबाग आलेल्या १५२ उमेदवारी अर्जांपैकी २ अर्ज अवैध ठरले. १५० अर्ज अवैध ठरले आहेत. २७ जानेवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. त्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल.



अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषदेचे ७ तर पंचायत समितीचे १४ मतदारसंघ आहेत. उमेदवारी दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत बुधवार ( दि. २१) १५२ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्यात जिल्हा परीषदेच्या सात जागांसाठी ५६ तर पंचायत समितीच्या १४ जागांसाठी ९६ अर्जांचा समावेश आहे.

गुरुवारी (दि. २२) उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली. त्यात काँग्रेसच्या सरोज डाकी यांचा पंचायत समितीच्या चौल मतदारसंघातील उमेदवारी अर्ज तर काँग्रेसचे अनिकेत नाईक यांचा पंचायत समिती वैजाळी मतदार संघातील उमेदवारी अर्ज प्रतिज्ञापत्र न दिल्यामुळे अवैध ठरला. २७ जानेवारी हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटचा दिवस आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिली.

# विसरलेली लॅपटॉप बॅग काही तासांत प्रवाशाला परत

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या सतर्क आणि प्रामाणिक कार्यपद्धतीमुळे एका प्रवाशाची लोकल ट्रेनमध्ये विसरलेली मौल्यवान सॅकबॅग अवघ्या काही तासांत शोधून त्यांना परत करण्यात आली.

बदलापूर येथील स्वप्नील अशोक पालकर सीएसएमटी ते कर्जत खोपोली लोकल ट्रेनने प्रवास करत होते. प्रवासादरम्यान त्यांनी त्यांची काळ्या रंगाची सॅकबॅग ट्रेनमधील रॅकवर ठेवली होती. बदलापूर येथे उतरल्यानंतर काही वेळाने त्यांच्या लक्षात आले की सॅकबॅग लोकलमध्येच विसरली. तोपर्यंत लोकल ट्रेन पुढे निघून गेली होती.



संबधित उपनगरीय लोकल खोपोली येथून पुन्हा कर्जत रेल्वे स्थानकात आली. तेव्हा एका जागरूक प्रवाशाने सदर सॅकबॅग रात्रपाळीतील ठाणे अंमलदार कुणाल साळुंखे यांच्याकडे जमा केली. त्यानंतर कर्जत लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या अंमलदार सुमित्रा दोंदे यांनी बॅगेत मिळालेल्या माहितीनुसार संबंधित प्रवाशाशी संपर्क साधून त्यांना कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात बोलावून घेतले वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी खाडे यांच्या समक्ष खातरजमा करून सदर सॅकबॅग त्यांना सुपूर्द करण्यात आली. या सॅकबॅगमध्ये डेल कंपनीचा लॅपटॉप आणि अंदाजे ४० हजार रुपये किमतीचे इतर साहित्य सुरक्षित स्थितीत परत मिळाल्याने स्वप्नील पालकर यांनी कर्जत लोहमार्ग पोलिसांचे आभार मानले.

# कर्जतमध्ये जि.प.चे दोन, तर पं.स.चे सहा अर्ज अवैध

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सहा जिल्हा परिषद गटासाठी ४९ नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आली होती. आज छाननी मध्ये त्यापैकी दोन नामनिर्देशन पत्र अवैध ठरली. पंचायत समितीच्या ८० नामनिर्देशन पत्रापैकी सहा नामनिर्देशन पत्र अवैध ठरली.

कर्जत तालुक्यात जिल्हा परिषद गटासाठी दाखल केलेल्या एकूण ४९ नामनिर्देशन पत्रापैकी दोन नामनिर्देशन पत्र अवैध ठरले त्यामुळे ४७ अर्ज वैध ठरले. परंतु त्या उमेदवारांनी भरलेले अन्य नामनिर्देशन पत्र मंजूर झाले त्यामुळे एकही उमेदवाराची उमेदवारी अवैध ठरली नाही. पंचायत समिती गणासाठी आलेल्या ८० अर्जांपैकी सहा अर्ज अवैध ठरले. त्यामुळे ७४ अर्ज वैध ठरली. २७ तारखेला उमेदवारी अर्ज मागे घ्यायचे आहेत. त्यावेळी निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल.

# फणसाड अभयारण्यात ३० जानेवारीपासून पक्षीगणना



**पाली: प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील निसर्गसंपन्न फणसाड वन्यजीव अभयारण्यात पुन्हा एकदा पक्ष्यांचा किलबिलाट मोजला जाणार आहे. 'ग्रीन वर्क्स ट्रस्ट' आणि 'महाराष्ट्र वन विभाग' (ठाणे वन्यजीव विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'फणसाड पक्षी गणना' आयोजित करण्यात आली आहे.

या उपक्रमात नागरिक, पक्षीमित्र आणि निसर्ग अभ्यासक सहभागी होऊन शास्त्रीय पद्धतीने पक्षी निरीक्षण आणि दस्तऐवजीकरण करतील. हा उपक्रम एसबीआय फाउंडेशनच्या कार्यक्रमांतर्गत राबवला जात आहे. ही केवळ एक सहल नसून एक महत्त्वाचा 'सिटिझन सायन्स' उपक्रम आहे. यामध्ये सामान्य नागरिक वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून पक्ष्यांची निरीक्षण नोंदवतील, ज्यामुळे या भागातील जैवविविधतेचा अधिकृत दस्तऐवज तयार होण्यास मदत होईल.

**फणसाड वन्यजीव अभयारण्य हे जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध क्षेत्र आहे. 'सिटिझन सायन्स' या संकल्पनेचा मूळ उद्देशच हा आहे की, सामान्य नागरिकांना सहभागी करून घेणे. या पक्षी गणनेच्या माध्यमातून संकलित होणारा डेटा हा केवळ आकडा नसून तो भविष्यातील संवर्धन आराखडा तयार करण्यासाठी महत्त्वाचा वैज्ञानिक दस्तऐवज ठरेल. निसर्गप्रेमींनी पुढे यावे.**

**-डॉ. निखिल भोपळे,**
व्यवस्थापकीय विश्वस्त,
ग्रीन वर्क्स ट्रस्ट

जेव्हा सामान्य माणूस विज्ञानाशी जोडला जातो, तेव्हा संवर्धनाचे कार्य अधिक वेगाने होते. फणसाड पक्षी गणना' हा केवळ एक छंद म्हणून राबवला जाणारा उपक्रम नसून, तो एक 'सिटिझन सायन्स' प्रकल्प आहे.

# केवा कंपनीकडून महामार्ग पोलिसांना अपघात सुरक्षाविषयक मार्गदर्शन

**महाड : प्रतिनिधी**

महामार्गावर अपघात झाल्यानंतर लागणारी आग कशा पद्धतीने आटोक्यात आणावी आणि त्याबाबत कशी खबरदारी घ्यावी याबाबत महाड औद्योगिक क्षेत्रातील केवा कंपनीच्या सुरक्षा विभागाकडून महाड महामार्ग पोलिसांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आग विझवण्याचे प्रात्यक्षिक देखील करून दाखवण्यात आले.



३७ व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाच्या पार्श्वभूमीवर महाड औद्योगिक क्षेत्रातील केवा फ्रेग्रान्सेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या सुरक्षा विभागाकडून रस्ता सुरक्षा बाबत महामार्गावरील वाहन चालकांना मार्गदर्शन तसेच प्रसिद्धी पत्रकांचे वाटप करण्यात आले. यावेळी महामार्ग पोलीस पथकातील पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर ढाकणे, केवा कंपनीचे विकास सासणे, केवा चे एच आर मॅनेजर रविंद्र चव्हाण, बिपीन माळी, प्रतिक शिंद, अक्षय जाधव, एल अँड टी कंपनीचे सुरक्षा अधिकारी हरिहर नायक हे उपस्थित होते.

महामार्गावर वाहन चालकांनी वाहन चालवताना कोणती काळजी घेतली पाहिजे याबाबत रस्ता सुरक्षा नियमांचे पालन कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याच अनुषंगाने महामार्गावर रासायनिक टँकरचे अपघात झाल्यानंतर पोलिसांनी हा अपघात कशाप्रकारे हाताळला पाहिजे याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. केव्हा कंपनीचे सुरक्षा अधिकारी राजू सासणे यांनी मार्गदर्शन करताना रासायनिक पदार्थ वाहून नेणाऱ्या वाहनांना अपघात झाल्यास रसायन कशा प्रकारचे आहे इथपासून ते लागलेली आग कशाने आटोक्यात येईल याबाबतचे तंत्रज्ञान आणि माहिती अवगत असणे आवश्यक असल्याचे सांगितले. सुरक्षा उपकरणे कशी हाताली पाहिजे याचे प्रात्यक्षिक देखील यावेळी करून देण्यात आले.

यावेळी एल अँड टी कंपनीच्या महामार्ग गस्त वाहनाचे काम कसे चालते आणि अपघात जन्यस्थितीच्या वेळेस प्रवाशांनी किंवा वाहन चालकांनी आमच्याशी कशा पद्धतीने संपर्क साधायचा याबाबत हरिहर नायक यांनी माहिती दिली. एल अँड टी कंपनीच्या माध्यमातून महाड महामार्ग पोलीस ट्रॅप शेजारी रस्ता सुरक्षा अभियानाच्या निमित्ताने वृक्ष लागवड करण्यात आले. यावेळी सुरक्षा पथकातील प्रसाद सागवेकर, रोशन जमदाडे, रामदास उत्तेकर, योगेश तांबे, ओमकार रहाटवलकर, पंकज पवार यांनी सहभाग घेतला होता.

# कोंडगाव येथे मोफत हृदय तपासणी

## १०८ नागरिकांनी घेतला शिबिराचा लाभ

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातील नागोठणे जवळील ऐनघर ग्रामपंचायत हद्दीमधील सुकेळी येथील असलेल्या जिंदल कंपनीच्या बी.सी. जिंदल रुग्णालयाच्या वतीने कोंडगाव येथे शनिवार दि.१७ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या मोफत हृदय तपासणी शिबिरात एकुण १०८ नागरीकांची जिंदाल रुग्णालयातील डॉ. मनिष रायकवार यांच्याकडून मोफत हृदय तपासणी तसेच विविध आजारांवरती तपासणी करून औषधोपचार करण्यात आले.

या शिबिरामध्ये नागरीकांची ईसीजी, रक्तदाब तपासणी, शरीरातील साखरेचे प्रमाण तपासून मोफत औषधे देण्यात आली. तसेच ताप, सर्दी, खोकला, सांधेदुखी, गुडघेदुखी अशा विविंध आजारांची तपासणी करून औषधे देण्यात आली. तसेच पुढील उपचारासाठी डॉ. मनिष रायकवार यांनी नागरीकांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या शिबिराला जिंदल रुग्णालयाचे व्यवस्थापक सर्वेश पांचोली, कमलेश अस्थांना ,डॉ.मनिष रायकवार, कोंडगाव ग्रामपंचायतींचे माजी सरपंच अनंत वाघ, अरविंद बुरुमकर, ग्रामसेविका कांचन राऊत, शाळेच्या शिक्षिका भाटकर , सामाजिक कार्यकर्ते कोंडगाव ग्रामस्थ उपस्थित होते.




**उरण नगरपरिषद, उरण**
ता. उरण, जिल्हा रायगड. पिन कोड ४००७०२
Email - municipalcounciluran@gmail.com urancouncil@rediffmail.com

**ई-निविदा सूचना क्र. ०१/२०२६**

उरण नगरपरिषद, उरण ता. उरण, जि. रायगड यांचेकडून उरण नगरपरिषदेच्या कर वसुली विभागाअंतर्गत उरण नगरपरिषद क्षेत्रातील जुन्या व नवीन मिळकत व खुले भूखंड यांचे भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे/प्रत्यक्ष सर्वेक्षण करून चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणे कामी नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदारांकडून गुणवत्ता निकषव्दारे ई-निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. २४/०१/२०२६ पासून उपलब्ध होईल.

दिनांक : २२/०१/२०२६
जा.क्र.उनप/करवि/ई-निविदा/२०२५-२६/२४७५

**सही/-**
**(समीर जाधव)**
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद, उरण


# क्यूआर कोड स्कॅन करून खोकरी घुमटाची ऑडिओ माहिती प्राप्त करा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील ऐतिहासिक स्थळांपैकी मुरूड आगरदांडा रस्त्यावर ६ कि.मी. अंतरावर खोकरीचे गुंबज गोल घुमटाची माहिती आता एक क्षणात मिळणार आहे. पुरातत्व विभागाने खोकरी गुंबड ई-वॉक ऑडिओ गाईड लिंक तयार केले आहे. त्याचे क्यु आर कोड स्कॉन केल्यावर क्षणात ऑडिओ व्दारे माहिती प्राप्त होणार आहे. या आधी जंजिरा फोर्ट ई- वॉक ऑडिओ गाईड ही सेवा सुरू केली होती.



यावेळी खोकरी गुंबड ई-वॉक ऑडिओ गाईडचे उपअधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. ए.व्ही. नागानूर यांच्या हस्ते क्यु आर कोड स्कॉनचं लोकार्पण करण्यात आले.यावेळी उपअधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ.ए.व्ही. नागानूर ,सहाय्यक अधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ शेख मुहिब, संवर्धन पुरातत्वशास्त्रज्ञ राजेश दिवेकर, संशोधन सहाय्यक किन्नरी पोलाडिया ,पुरातत्व सहाय्यक संवर्धक बजरंग येलीकर,पुरातत्व बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे यावेळी उपस्थित होते.

मुरुडमधील खोकरी घुमट हे साडेतीनशे वर्षांपूर्वीचे शिल्प इतिहासप्रेमींचे आकर्षण आहे.या ठिकाणी सिद्दी सिरुलखान, सिद्दी खैरियतखान व सिद्दी याकुतखान यांच्या या कबरी आहेत. दगडाचे बांधकाम असलेले इंडो-सारसेनिक पद्धतीत बांधलेले हे गुंबज आहेत. त्यापैकी सर्वात मोठे गुंबज हे सिद्दी सिरूलखानचे असून हे १६७० ते १६७७ व १६९६ ते १७०७ या कालावधीत बांधले होते. सिद्दी याकुतखान हा १६७० ते १६७७ व १६९६ ते १७०७ या कालावधीत तर सिद्दी खैरियत खान हा याकुतखानाचा भाऊ १६७७ ते १६९६ या कालावधीत बांधले होते. या वास्तुंच्या घुमट आणि कमानींतील प्रमाणबद्धता पाहण्यासारखी आहे. या ऐतिहासिक खोकरीचे गुंबज गोल घुमट वास्तुशास्त्राचा अजोड नमुना असल्याने सदरील हे ऐतिहासिक ठिकाण बघण्यासाठी देशी- विदेशी पर्यटक येत असतात.परंतु माहिती विना फक्त फोटो काढून परतावे लागत होते आता खोकरी गुंबड ई-वॉक ऑडिओ गाईड लिंक स्कॉन केलात तर मराठी, इंग्रजी, हिंदी भाषेतुन ऑडिओ तुन मिळणार आहे.


**अलिबाग नगरपरिषद**
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१
**निविदा सूचना सन २०२५-२६**

अलिबाग नगरपरिषदेकरीता Air quality monitoring unit करीता wire / cable खरेदी करणेबाबत फेर निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा सुचना अलिबाग नगरपरिषद कार्यालयात दि. २३/०१/२०२६ पासून उपलब्ध आहेत. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल / सुधारणा असल्यास प्रसिध्द करणेत येईल.

दिनांक : २२/०१/२०२६
जा.क्र. २०

**सही/-**
**(सागर साळुंखे)**
**मुख्याधिकारी**
अलिबाग नगरपरिषद

महावितरण

**जाहीर निवेदन**

**अलिबाग विभागातील वीजबिल थकीत ग्राहकांसाठी जाहीर सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. अलिबाग विभागाअंतर्गत अलिबाग उपविभाग-१, अलिबाग उपविभाग-२ व उपविभाग पेण अंतर्गत सर्व वीजग्राहकांमध्ये रू. १०००/-पेक्षा जास्त व ४५ दिवसांपासून थकीत वीजबिल असलेल्या ग्राहकांविरूद्ध महावितरण तर्फे वीजपुरवठा खंडीत करण्याबाबत कडक कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबतची पुर्व सूचना ग्राहकांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी, ई-मेल U/s 56 Of EA2003 वारंवार देऊनही वीजबिल न भरलेल्या ग्राहकांचा वीजपुरवठा दिनांक २३.०१.२०२६ रोजी पासून पुढे सकाळी ०८ वाजल्यानंतर कोणतीही पूर्व सूचना न देता खंडीत करण्यात येणार आहे. वीज पुरवठा खंडीत झाल्या नंतर पुन्हा सूरू करण्यासाठी पुर्ण थकबाकी भरणे आवश्यक असून त्यासोबतच सिंगल फेजसाठी रु. ३१०/- व थ्री फेजसाठी रू. ५२०/- पुनर्जोडणी शुल्क आकारण्यात येईल. सर्व थकबाकीदार ग्राहकांनी याची नोंद घ्यावी. सर्व सन्माननीय वीजग्राहकांनी वीज बिल भरून सहकार्य करावे अन्यथा वीजपुरवठा खंडीत करण्यात येणार आहे, असे आवाहन महावितरण अलिबाग विभागाने केले आहे. कृपया संबंधित वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी व म.रा.वि.वि. कंपनीस सहकार्य करावे.

**PRO No. 009** **कार्यकारी अभियंता, महावितरण, अलिबाग विभाग.**

**रोहा अष्टमी नगर परिषद**
तालुका-रोहा, जिल्हा-रायगड. पिन कोड ४०२१०९
फोन:- कार्यालय ०२१९४ २३५५२०,
Email : rohanagarpalika@gmail.com, coud.rohamaharashtra.gov.in

क्र.रोनप जा.क्र./पाणीपुरवठा/२३४४/२०२५-२०२६ दिनांक : २१-०१-२०२६

**निविदा सूचना प्रसिध्दी**

रोहा अष्टमी नगर परिषदेद्वारे नगर परिषदेच्या डोलवहाळ येथील उर्द्धवाहिनीवर नवीन जलमापक यंत्र बसविणे व त्याची देखभाल दुरुस्ती करणे कामासाठी विहित नमुन्यात दरपत्रक/ कोटेशन मागविण्यात येत आहे. सदर कामांचा तपशील रोहा नगर परिषद कार्यालयाच्या पाणीपुरवठा विभागात गुरुवार दिनांक २३/०१/२०२६ सकाळी १०.३० वाजलेपासून ते मंगळवार दिनांक. ०३/०२/२०२६ दुपारी २.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील. तरी कामांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | पाणीपुरवठा विभागातील डोलवहाळ येथील उर्द्धवाहिनीवर नवीन जलमापक यंत्र बसविणे व त्याची देखभाल दुरुस्ती करणे बाबत. |

**सही/-**
**अजयकुमार एडके**
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगरपरिषद

**सही/-**
**वनश्री अवनी समिर शेडगे**
नगराध्यक्षा
रोहा अष्टमी नगरपरिषद

# नवी मुंबईत ७४१ कुपोषित बालकांचे ‘पुनर्वसन’

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत १२ नोव्हेंबर २०२४ रोजी रामतनु माता बाल रूग्णालय तुर्भे येथे पोषण पुनर्वसन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रामार्फत तीव्र कुपोषित तसेच मध्यम कुपोषित बालकांची तपासणी, वैद्यकीय उपचार व पोषण पुनर्वसन सेवा दिली जाते.



या एनआरसी केंद्राच्या माध्यमातून कुपोषित बालकांची ओळख, आवश्यकतेनुसार रुग्णालयीन उपचार, पोषण व्यवस्थापन व पुढील देखरेखीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. केंद्र सुरू झाल्यापासून आतापर्यंत दोन बालकांना तीव्र कुपोषण असल्याच्या संशयावरून रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्या बालकांच्या पुढील वैद्यकीय तपासणी व मूल्यमापनानंतर त्यापैकी एका बालकामध्ये तीव्र कुपोषण आणि दुसऱ्या बालकामध्ये मध्यम कुपोषण असल्याचे निष्पन्न झाले असून या दोन्ही बालकांची प्रकृती सध्य स्थिरआहे.

तुर्भे रामतनु माता बाल रुग्णालयाव्यतिरिक्त वाशी, नेरूळ व ऐरोली सार्वजनिक रुग्णालयांमार्फत आत्तापर्यंत १२८ तीव्र कुपोषण असलेलबालकांवर आणि ७१३ मध्यम कुपोषण बालकांवर उपचार करण्यात आले आहेत. गरजेनुसार या बालकांचे पोषण सुधारण्यासाठी आहार व इतरआहार देऊन उपचार करण्यात आले आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून मागील वर्षात १८ पोषण व आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये आढळणाऱ्या संशयित बालकांना रुग्णालयामध्ये संदर्भित करण्यात येते. त्याठिकाणी त्यांची तपासणी करून खातरजमा केली जाते व त्यांच्यावर आवशकतेनुसार उपचार केले जातात. नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत कुपोषणमुक्त बालक घडविण्याच्या उद्देशाने बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक सेवा दिली जात आहे.

# वाशीत १७५ झोपड्यांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी गाव हाय टेन्शन वायरखालील परिसरात नमुंमपा व सिडकोच्या जागेवर अनधिकृत झोपडपट्ट्यांवर तोडक कारवाई करुन एकूण १७५अनाधिकृत झोपड्या निष्कासित करण्यात आल्या. या धडक मोहिमेसाठी वाशी विभाग कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, अतिक्रमण पोलीस, सुरक्षा रक्षक, मजूर व दोन जेसीबीच्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले.

नवी मुंबईत बुधवारी दिवसभरात प्रत्येक विभागात अतिक्रमण विभागाने कारवाई केली. जंबो कारवाई करत पालिकेने बेघर, अनधिकृत झोपड्या, फेरीवाले हटवून रस्ते, भुखंड, पदपथ मोकळे केले. या कारवाईने अधिकृत फेरीवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

अशाच प्रकारे करावे गांव सेक्टर ३८ प्लॉट नंबर १५८ च्या समोर नवी मुंबई महानगरपालिकेच्या उदयानासाठी राखीव असलेल्या भुखंडावर अतिक्रमण करुन साधारणत: २९ कच्च्या खोल्यांचे बांधकाम केले होते. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते. अनधिकृत बांधकाम हटविले नसल्याचे निदर्शनास आले आहे. कोपरखैरणे रेल्वे स्टेशन बेघर लोकांवर कारवाई करून साहित्य डम्पिंग येथे जमा करण्यात आले. ठाणे बेलापूर रोड ब्रिज खालील बेघर लोकांवर कारवाई करून साहित्य डम्पिंग येथे जमा करण्यात आले.

सिवूड्स सेक्टर ४४ येथील रस्त्यावर विनापरवानगी उभारलेली पत्रा शेड जेसीबीच्या साह्याने हटवण्यात आली. घणसोली व कोपरखैरणे विभागात फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली. तसेच सामाईक जागेत उभारलेल्या व्यवसायावरदेखील कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले.

# गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रात माघी गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत असतो. या पार्श्वभूमीवर मागील वर्षीप्रमाणेच महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने माघी गणेशोत्सवातील श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी नैसर्गिक पारंपारिक २२ विसर्जन स्थळांच्या जवळ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आलेली आहे. नागरिकांनी आपल्या श्रीमूर्तींचे विसर्जन महानगरपालिकेने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन तलावांमध्ये करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

अभियांत्रिकी विभागाच्या वतीने शहर अभियंता श्री.शिरीष आरदवाड यांच्या नियंत्रणाखाली २२ ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून त्यावर संबंधित विभाग कार्यालयांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचे निरीक्षण व दोन्ही परिमंडळांचे उपायुक्त सोमनाथ पोटरे व संजय शिंदे यांचे नियंत्रण असणार आहे.

या विसर्जन स्थळांवर ओले व सुके निर्माल्य टाकण्यासाठी निर्माल्य कलश व्यवस्था असणार आहे. त्याचप्रमाणे निर्माल्य वाहतुकीसाठीही स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. या विसर्जन स्थळांवर स्वयंसेवक कार्यरत असणार असून अग्निशमन जवानही. त्याचप्रमाणे आरोग्य पथकेही सज्ज असणार आहेत. माघी गणेशोत्सवाचा विसर्जन सोहळाही उत्साहात आणि निर्विघ्नपणे पार पडावा यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक सर्व व्यवस्था करण्यात आलेली आहे.

माघी गणेशोत्सवात प्रतिष्ठापना केलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या श्रीमूर्तींचे विसर्जन तसेच शाडूच्या मूर्तींचेही विसर्जन पर्यावरणशील दृष्टीकोन जपत कृत्रिम विसर्जन तलावात करावे, असे आवाहन नवी मुंबई पालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# वक्तृत्व स्पर्धेत गव्हाण विद्यालयातील तीन विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पनवेल तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी लहान व मोठ्या गटात प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरावरील आपले स्थान निश्चित केले. लहान गटात आरोही बापू नाळे हिने प्रथम क्रमांक पटकावला तर आलिया परविन आझम खान हिला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. मोठ्या गटात स्मित कुंदन मोकल याने प्रथम क्रमांक पटकावला.



रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने पनवेल येथील के.आ.बांठिया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तालुका स्तरावरील ह्या स्पर्धेत विजयी झालेल्या गव्हाण विद्यालयाच्या ह्या तिन्ही विद्यार्थ्यांची रोहा येथे संपन्न होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पनवेल तालुकास्तरीय स्पर्धेत तालुक्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील पंचवीस स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. या वेळी मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष आणि के.बांठिया शाळेचे मुख्याध्यापक माळी तसेच उपमुख्याध्यापक छगन तिरमले व अन्य मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, प्राचार्या तसेच रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकाला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रविंद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे या सर्वांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि विशेष कौतुक केले. त्याचप्रमाणे रोहा येथील मेहंदळे कॉलेजमध्ये होणाऱ्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी या तीनही विद्यार्थ्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या.

गव्हाण शाखेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. हर्षला पाटील व सागर रंधवे यांनी या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# उरणमध्ये मतदान जनजागृती कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागाव या शाळेमध्ये बुधवारी (दि. २१) उरण तालुका कार्यक्रमांतर्गत पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूक जाहीर झाल्यानंतर मोठ्या उत्साहात घेण्यात आला या कार्यक्रमाला नागाव गावातील बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

सुरुवातीला नागाव शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील मॅडम यांच्या हस्ते सर्व उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बबन पाटील यांनी केले. तर मार्गदर्शन उरण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत यांनी केले. मार्गदर्शनपर बोलताना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लागली असून ५ फेब्रुवारीला सर्व जनतेने आपापल्या घरामध्ये आजूबाजूला शेजारी, काका, मामा, मावशी, दादा, ताई यांना आपल्या मतदानाचा हक्क बजावण्यासाठी प्रवृत्त करावे. मतदान हा आपला संविधान दिलेला हक्क आहे. तो त्या दिवशी बजवावा असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागाव शाळेच्या उपशिक्षिका संगीता मेहेत्रे तर आभार संजय होळकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी या टीमच्या प्रमुख निर्मला घरत, गटशिक्षणाधिकारी उरण यांच्या नेतृत्वाखाली बबन पाटील, प्रशांत कोळी, संजय होळकर, अजित जोशी, अनिल म्हात्रे, संगीता गावंड, रुपेश पाटील, संगीता मेहेत्रे यांनी विशेष मेहनत घेतली.



# स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचा भाजप महायुतीला पाठिंबा

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर व विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांची भेट घेऊन आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीकरीता पाठिंबा दर्शवण्याचे पत्र दिले. त्यावेळी त्यांच्यासोबत पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, पनवेल शहराध्यक्ष प्रशांत सोनवणे, अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष आसिफ शेख, चंद्रकांत वेळास कर भारत दाताड, समाधान कांबळे, अशोक कदम इत्यादी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



पनवेल तालुक्यातील गव्हाण, वडघर सहित आठ जिल्हा परिषद मतदार संघामध्ये व १६ पंचायत समिती मतदार संघामध्ये स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाच्या वतीने महेश साळुंखे यांनी महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे व तश्या प्रकारचे पत्र त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर व पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांची भेट घेऊन त्यांना स्वाधीन केलेले आहे. काही दिवसापूर्वी पार पडलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सुद्धा स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाने महायुतीला जाहीर पाठिंबा दिलेला होता.

# सीकेटी महाविद्यालयातर्फे चिरनेरमध्ये नवीन मतदार नोंदणी

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था संचलित, चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नवीन पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त), हे मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न असलेले एक बहुविध शाखांचे उत्कृष्ट उच्च शिक्षणसंस्थान आहे. शैक्षणिक उत्कृष्टतेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारे हे महाविद्यालय विविध स्तरावर उपक्रमांच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहे. याच सामाजिक दायित्वाच्या भावनेतून लेखा व वित्त विभागाच्या वतीने चिरनेर (ता. उरण) गावात नवीन मतदार नोंदणी अभियान यशस्वीरीत्या राबविण्यात आले.



हा उपक्रम १७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. गावातील नागरिकांना नवीन मतदार नोंदणी, मतदार ओळखपत्र दुरुस्ती, नाव समावेशन, पत्ता बदल तसेच मतदान प्रक्रियेचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा असून आपला मताधिकार वापरणे हे कर्तव्य आहे, हा संदेश या अभियानातून प्रभावीपणे देण्यात आला.

या कार्यक्रमाचे नेतृत्व लेखा व वित्त विभागाचे विभागप्रमुख डॉ. निलेश कोळी यांनी केले. शिक्षक प्रतिनिधी म्हणून मनोज सुपेकर, भुषण भोईर, रेश्मा केणी व मोनिका भालेराव यांनी नवीन मतदार नोंदणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेत नागरिकांना आवश्यक कागदपत्रांची माहिती, अर्ज भरण्याची पद्धत, पडताळणी प्रक्रिया व पुढील टप्प्यांचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही स्वयंसेवक म्हणून नागरिकांना मदत करून सामाजिक भान आणि जबाबदारीचे उत्तम उदाहरण सादर केले.

या कार्यक्रमाला चिरनेर गावाचे सरपंच भास्कर मोकल व ग्रामपंचायत सदस्य सचिन घबाडी यांची उपस्थिती लाभली. त्यांनी महाविद्यालय व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे गावातील नागरिकांमध्ये लोकशाही मूल्यांबद्दल जागरूकता वाढत असल्याचे मत व्यक्त केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रम अधिक सुसूत्र आणि प्रभावीपणे पार पडला. ज्येष्ठ नागरिक दामोदर केणी यांनी विशेष योगदान देत गावातील नागरिकांमध्ये समन्वय साधला. त्यांनी ज्येष्ठ नागरिक, महिला व नवमतदारांना प्रोत्साहित करून नोंदणी प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रेरित केले.

या अभियानादरम्यान एकूण ६२ नागरिकांची यशस्वी मतदार नोंदणी करण्यात आली. विशेषतः प्रथमच मतदान करणाऱ्या तरुणांचा सहभाग लक्षणीय ठरला. अनेक नागरिकांनी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच संस्थेचे सचिव एस. टी. गडदे आणि प्राचार्य डॉ. एस. के. पाटील याचे मार्गदर्शन लाभले.

# कवितेतून वाहतूक नियमांची शिकवण

## पनवेलमध्ये विद्यार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षा जागृतीपर अभिनव उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चे औचित्य साधून पनवेल शहर वाहतूक शाखेच्या वतीने के.ए. बांठिया हायस्कूल, नवीन पनवेल तसेच छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, पळस्पे येथे विद्यार्थ्यांसाठी वाहतूक नियम जनजागृतीचा अभिनव व प्रभावी कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत कवी मोहन काळे यांच्या माध्यमातून कविता व चारोळ्यांच्या सहाय्याने वाहतूक नियमांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्यात आले. या वेळी शाळांना पुस्तक संचाचेही वितरण करण्यात आले.



रस्त्यांवरील वाढते अपघात, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि त्यातून होणारे जीवितहानीचे प्रकार रोखण्यासाठी केवळ दंडात्मक कारवाई पुरेशी नाही, तर लहान वयातच सुजाण नागरिक घडवणे आवश्यक आहे, या हेतूने पनवेल शहर वाहतूक शाखेने हा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या वेळी पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने व तुकाराम कदम यांनी आपल्या अनुभवाच्या आधारे विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे महत्त्व समजावून सांगितले.

पोलीस हवालदार युवराज येळे, अमीर मुलाणी, ज्ञानेश्वर पवार, महेंद्र गळवी, सागर यादव, प्रदीप चव्हाण व सुरेश यादव या अंमलदारांनी व आरएसपी शिक्षक डी.जी. पवार, म्हात्रे, महाजन, यांनी शिस्तबद्ध व सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात कवी मोहन काळे यांनी आपल्या पुस्तकांतील कवितांच्या माध्यमातून वाहतूक नियमांबाबत अत्यंत प्रभावी आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कवितेच्या माध्यमातून दिलेला संदेश विद्यार्थ्यांच्या मनावर विशेष ठसा उमटवणारा ठरला.

या उपक्रमाला शाळा प्रशासनाचीही खंबीर साथ लाभली. के.ए. बांठिया हायस्कूलचे प्राचार्य बी.एस.माळी तसेच छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, पळस्पे येथील मुख्याध्यापक चिखलेकर यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे पालन का आवश्यक आहे, याबाबत सविस्तर व प्रेरणादायी माहिती दिली.

पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांनी विद्यार्थ्यांना ‘वाहतूक सुरक्षा शपथ’ दिली.

# एमपीएएससी महाविद्यालयात ई-राज्यस्तरीय चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे पनवेलमधील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य (एमपीएएससी) महाविद्यालयातील इतिहास विभाग आणि IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने ३ जानेवारी २०२६ रोजी The Contribution of Women to the Indian Independence या विषयावर आधारित एकदिवशीय राज्यस्तरीय ई-चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या ई-चर्चासत्रासाठी बीजभाषक म्हणून मा.डॉ.जास्वंदी वामबुरकर (एस. एन. डी टी. महिला विद्यापीठ,चर्चगेट कॅम्प ,मुंबई) व मार्गदर्शक म्हणून मा.डॉ. शीतल पंचीकर (इतिहास विभाग, एल्फिन्स्तोन कॉलेज Elphinstone College मुंबई) तसेच संशोधन पेपर सादरीकरण सत्राचे चे प्रमुख म्हणून डॉ.रत्नप्रभा म्हात्रे (इतिहास विभाग प्रमुख, सीकेटी महाविद्यालय, पनवेल) यांना निमंत्रित केले होते.



या चर्चासत्राचे बीजभाषक मा.डॉ. जास्वंदी वामबुरकर यांनी आपल्या बीज भाषणामध्ये भारतीय स्त्रियांनी कशा प्रकारे स्वांतत्र्य चळवळीत सहभाग घेतला, कोणते कार्य केले, तुरुंगवास भोगलायांची माहिती सांगितली. तर प्रमुख मार्गदर्शक मा.डॉ. शीतल पंचीकर यांनी १८५७ च्या उठावात महिलांनी कोणती भूमिका पार पाडली,कोणत्या महिला सहभागी होत्या ,त्यांचे कार्य सांगितले या चर्चासत्राची सुरुवात प्रास्ताविक करून महाविद्यालयाचे सन्मा. प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर साहेब यांनी केली.

प्रस्ताविकेच्या माध्यमातून त्यांनी चर्चा सत्रासाठी उपस्थित असलेले बीजभाषक व मार्गदर्शक तसेच संशोधन पेपर सादरीकरण सत्राचे चे प्रमुख यांचे स्वागत केले. राज्यस्तरीय ई-चर्चासत्राचे महत्त्व सांगताना त्यांनी भारतीयत स्वातंत्र्यासाठी महिलांची भूमिका, त्यांचे योगदान यांचे किती महत्त्व आहे हेदेखील थोडक्यात समजावून सांगितले.

चर्चासत्रामध्ये उपस्थित असलेले बीजभाषक मा.डॉ.जास्वंदी वामबुरकर यांची ओळख इतिहास विभागातील प्रा.अतुल पोखरकर यांनी केली तर प्रमुख मार्गदर्श मा.डॉ. शीतल पंचीकर यांची ओळख इतिहास विभागाचे विभाग प्रमुख डॉ .सुनील परदेशी यांनी केली. सदर चर्चासत्राचे आभार प्रदर्शन प्रा.प्रवीण गायकर यांनी केले. चर्चासत्राचे निवेदन डॉ. प्रफुल्ल वशेनिकर यांनी केले. उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील व डॉ.लक्ष्मण गवळी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.तर तांत्रिक सहाय्यक म्हणून प्रा.रवींद्र मोरबेकर, डॉ. लक्ष्मण राठोड, प्रा. सोपान गोवे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

एकदिवशीय ई- चर्चासत्रामध्ये शंभरहुन अधिक (महाराष्ट्र राज्यातून) संशोधकांनी आपला सहभाग नोंदविला होता.

# अलिबागमध्ये भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी बुधवारी (दि. २१) अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी एकूण ७२ अर्ज दाखल झाले. जिल्हा परिषदेसाठी २४ तर पंचायत समितीसाठी ४८ अर्ज दाखल झाले. अलिबाग तालुक्यात शेवटच्या दिवसापर्यंत एकूण १५० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. गुरुवारी (दि. २२) उमेदवारी अर्जांची छाननी झाली.





अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ७ तर पंचायत समितीच्या १४ जागा आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा बुधवारी शेवटचा दिवस होता. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी केली होती. शिवाच्या दिवशी जिल्हा परिषदेच्या शहापूर मतदारसंघातून अ‍ॅड. आस्वाद पाटील, थळमधून जान्हवी पारेख, काविर गटामधून अशोक वारगे, चौलमधून उदय काठे या भाजपच्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. उदय काठे यांनी पंचायत समितीच्या रेवदंडा गणातून देखील उमेदवारी अर्ज दाखल केला.

अलिबाग तालुक्यात आज शेवटच्या दिवसापर्यंत एकूण १५० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यात जिल्हा परीषदेच्या सात जागांसाठी ५५ तर पंचायत समितीच्या १४ जागांसाठी ९५ अर्जांचा समावेश आहे. यामध्ये प्रमुख राजकीय पक्षांबरोबरच अपक्ष उमेदवारांचीही संख्या मोठी आहे.

---

मंगेश काळोखे हत्या प्रकरण

# आरोपी भरत भगतची तळोजा कारागृहात रवानगी

**खोपोली : प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणार खोपोलीतील मंगेश काळोखे हत्या प्रकरणातील पंधरावा आरोपी भरत भगत (रा.अवसरे) कर्जत याची मंगळवारी पोलीस कोठडी संपल्यानंतर न्यायालयाने पंधरा दिवसाची न्यायालयीन कोठडी ठोठावत तळोजा कारागृहात रवानगी केली आहे.

खोपोलीतील नगरसेविका मानसी काळोखे यांचा पती मंगेश यांच्या हत्येचे सूत्रधार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा प्रवक्ता भरत भगत आणि जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे असल्याचा आरोप काळोखे यांच्या पत्नीने केला होता. खूनात प्रत्यक्ष सहभागी आरोपींना आणि कट रचणाऱ्याला अटक केल्यानंतर भरत भगत चोवीस दिवस फरारी होता.

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने रविवारी खालापूर भागातून भरत भगतला अटक केली होती. खालापूर न्यायालयात हजर केले आरोपी भगत यांना मंगळवार २० जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर भगतला कोर्टात हजर केले असताना न्यायालयीन कोठडी मिळाली आहे.

---

# अंतिम दिवशी महाड तालुक्यातून ६८ अर्ज दाखल

**महाड : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी २१ जानेवारी या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी महाड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ५ गटांसाठी २५ तर पंचायत समितीच्या १० गणांसाठी ४३ असे एकूण ६८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. ही निवडणूक ५ फेब्रुवारी रोजी होत असून ७ फेब्रुवारी रोजी निकाल लागणार आहे.

बुधवारी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने महाड प्रांत कार्यालयासमोर मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले. यामध्ये जिल्हा परिषद गटासाठी बिरवाडी विभागातून ४,खरवली विभागातून ४, नडगाव तर्फे बिरवाडी विभागातून ६, दासगाव ३ आणि करंजाडी विभागातून ८ असे एकूण २५ उमेदवारी अर्ज भरण्यात आले. त्याचप्रमाणे पंचायत समिती गटासाठी धामणे –३, बिरवाडी –३, वरंध –७, खरवली–४, नडगाव तर्फे बिरवाडी –४, नाते –५, दासगाव ३,अप्पडतुडी –४, करंजाडी ५आणि विन्हेरे ५ असे एकूण ४३ पंचायत समिती गणासाठी उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

---

# राष्ट्रवादीच्या संदेश शेवाळेंचा उमेदवारी अर्ज दाखल

**पाली : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये सुधागड तालुक्यात मोठी अटीतटीची व चूरसपूर्ण लढत पहावयास मिळणार आहे. येथील पंचायत समिती अडुळसे गणातून राष्ट्रवादी व भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सुधागड तालुका अध्यक्ष, युवा व सक्षम नेतृत्व संदेश परशुराम शेवाळे यांनी राष्ट्रवादी व भाजपा महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह पाली तहसील कार्यालयात उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.दीपा भोसले व तहसीलदार उत्तम कुंभार यांच्याकडे उमेदवारी अर्ज सुपूर्द केला.



या वेळी तरुण तडफदार, कार्यकुशल नेतृत्व आणी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संदेश शेवाळे यांनी पंचायत समिती अडुळसे गणातून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. अडुळसे गणात सर्वसाधारण आरक्षण पडल्याने अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, मात्र या गणात राष्ट्रवादीच्या माध्यमातून व वैयक्तिक अनेक विकास कामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत.राष्ट्रवादीचे सुधागड तालुकाध्यक्ष संदेश शेवाळे यांनी या भागात जनहिता बरोबर विकासकामे केल्याने अडुळसे गणात महायुतीचे पारडे जड असल्याचे बोलले जात आहे.

या वेळी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ कार्यकर्ते ग.रा.म्हात्रे, डी.सी.चव्हाण, सरचिटणीस सुनिल राऊत, माजी सभापती साक्षीताई दिघे, नगरसेवक सुलतान बेनसेकर, सरपंच श्याम खंडागळे, सखाराम दिघे, अ‍ॅड.नितीन शेवाळे, संदेश बारस्कर, संदेश जाधव,प्रमोद ठोंबरे, सखाराम शिंदे, काजल जाधव, प्रणील हळदे, परशुराम शेवाळे, सई शेवाळे आदींसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# देशाचा ७७वा प्रजासत्ताक दिन सोहळा पोलीस कवायत मैदानावर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त रायगड जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी रोहयो, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत विठाबाई मारुती गोगावले यांच्या हस्ते अलिबाग पोलीस मुख्यालय मैदान येथे सकाळी ९.१५ वा.संपन्न होणार आहे.

ध्वजारोहणाच्या वेळी राष्ट्रीय/समारंभीय पोषाख परिधान करण्यात यावा. ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८–३० ते १० वाजेदरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वतःचा ध्वजारोहणाचा समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८–३० पूर्वी किंवा सकाळी १० वाजेनंतर करावा.

ध्वजसंहितेतील सर्व नियमांचे व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. कागदी राष्ट्रध्वजाचा वापर ध्वजसंहितेच्या तरतूदीमध्ये नमूद केल्यानुसारच करावा. ख़राब झालेले माती लागलेले राष्ट्रध्वज गोणी किंवा कपड्यामध्ये व्यवस्थित बांधून शिवून बंद करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनांनी तसेच नागरिकांनी हे राष्ट्रध्वज तहसिल कार्यालयात सुपूर्द करावेत. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखावा.

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

---

# विघ्नेश माळी यांनी भरला उमेदवारी अर्ज

## आमदार महेंद्र दळवी यांची उपस्थिती

**मुरूड : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांचे कट्टर समर्थक शिवसेना युवा नेते विघ्नेश विजय माळी यांनी ३८ राजपुरी गटातुन जिल्हा परिषद सदस्य पदाकरीता तर कोर्लई गटातुन ज्योती रमेश नागावकर तर बोर्ली पंचायत समिती गणातुन निलेश घाटवल, नांदगाव पंचायत समिती गणातुन गणेश प्रभाकर नाक्ती व विजय काबुकर, कोर्लई पंचायत समिती गणातुन स्वाती चवरकर, राजपुरी पंचायत समिती गणातुन करुणा पाटील व अश्विनी जंगम यांनी आपला उमेदवारी अर्ज जोरदार शक्तिप्रदर्शन करत तहसीलदार कार्यालय पर्यत येऊन तहसीलदार दालनात जाऊन निवडणूक निर्णय अधिकारी सर्जेराव सोनावणे यांच्या कडे उमेदवारी अर्ज सुपूर्द करण्यात आले.



या वेळी आमदार महेंद्र दळवी, महिला जिल्हा प्रमुख तुप्ती पाटील, उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, मुरूड नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, युगा ठाकुर, पक्षांचे निवडणूक निरीक्षक –भाई खांडे, युवा उपजिल्हाप्रमुख दिपेश वरणकर, वावडुंगी सरपंच ऋतुजा वरणकर, जिल्हा संघटक यशवंत पाटील, उपतालुकाप्रमुख मनोज कमाने, रमेश नागावकर, भगीरथ पाटील, श्रीकांत सुर्वे, अमोल लाड, मंदा म्हात्रे, सी एम ठाकूर, गणेश मोन्नाक, अजगर दळवी आदिंसह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले की, विकासाच्या जोरावर आम्ही ही निवडणूक लढवत आहोत विरोधाकडे कोणतेही मुद्दे नसल्याने शिवसेना पक्षांच्या विरोधात सर्व विरोधक एकत्र आले आहेत. जनतेला माहित आहे की तालुक्याचा विकास कोणी केला. तरी येथील जनता शिवसेना पक्षांच्या पाठी मागे उभे राहुन विकासाला मत देऊन माझ्या सर्व शिलेदारांना निवडुन देतील आणि पंचायत समिती वर जिल्हा परिषदेवर भगवा फडकेल, अशी प्रतिक्रिया आमदार महेंद्र दळवी यांनी दिली.

---

# नागोठणे जिल्हा परिषद गटातून किशोर जैन यांचा अर्ज दाखल

**नागोठणे : बातमीदार**

जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आजचा (दि.२१) शेवटचा दिवस असून नागोठणे जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी (अजित पवार गट) कडून किशोर जैन व नागोठणे पंचायत समिती गणातून समृद्धी संतोष कोळी यांनी जबरदस्त शक्तिप्रदर्शन करीत रोहा प्रांत कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे उमेदवारी अर्ज दाखल केला.



या वेळी राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, मधुकर ठमके, विलास चौलकर, संजय भोसले, नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, डॉ. मिलिंद धात्रक, विभागीय अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, उपसरपंच अकलाख पानसरे, संजय काकडे, सुधाकर पारंगे, अनिलशेठ काळे, हिराजी शिंदे, सुरेश जैन, प्रमोद जांबेकर, निवास पवार, चंद्रकांत भालेकर, ज्ञानेश्वर साळुंखे, संतोष नागोठणेकर, धनंजय जगताप, अनिल महाडिक, मनोज टके, चेतन टके, प्रथमेश काळे, कार्तिक जैन, जितेंद्र जाधव, केतन भोय, सुधाकर जवके, सखाराम ताडकर, भाई शिर्के, मोहन नागोठणेकर, अ‍ॅड. श्रीकांत रावकर, अतुल काळे, पिंटूशेठ जैन, जुगनशेठ जैन, झिमाशेठ कोकरे, रुचिर मोरे, बिपीन सोष्टे, संगिता जैन, रिचा धात्रक, सुजाता जवके, आशा शिर्के, श्वेता चौलकर, प्रतिभा तेरडे, सुप्रिया काकडे, अमृता महाडिक, भाविका गिजे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

अर्ज दाखल कारण्यापूर्वी उमेदवार व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. तदनंतर श्री जोगेश्वरी मंदिरापासून जोरदार घोषणा देत रॅली नागोठणे ग्रामपंचायत समोरून छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर उमेदवारांसह असंख्य कार्यकर्ते रोहा येथील प्रांत कार्यालयात गेल्यानंतर अर्ज दाखल करण्यात आले.

---

# भिमराज मोरे यांना सेवानिरोप

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील इंदापूर गावचे रहिवाशी व खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी शाळेचे शिक्षक भिमराज रघुनाथ मोरे हे शनिवार ३१ जानेवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा बुधवारी (दि.२१) राजिप शाळा उतेखोल माणगाव येथे उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

या वेळी शिक्षक भिमराज मोरे यांना उपस्थित केंद्रप्रमुख शंकर शिंदे, शिक्षक अमित पानसरे, आदर्श शिक्षिका विनया जाधव,शिक्षक रमेश उभारे,भिमराज मोरे यांच्या पत्नी पूनम मोरे यांच्यासह उपस्थित अनेक शिक्षक भगिनींनी सेवानिवृत्तीच्या भरभरून शुभेच्छा दिल्या. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक भिमराज मोरे यांनी आपल्या मनोगतातून आपल्या शिक्षकी पेशेच्या ३० वर्षाच्या कार्याची माहिती देत वेगवेगळे अनुभव सांगत आपला कौटुंबिक सेवापूर्ती सोहळा अयोजित केल्याबद्दल उतेखोल केंद्राचे तसेच उपस्थित केंद्रप्रमुख व सर्व शिक्षकांचे मनापासून आभार व ऋण व्यक्त केले.

या कार्यक्रमास शिक्षक संगीता उभारे,सुनीता पिंगळे,नंदिनी वाले, सुदर्शन वाघोरकर, अजित शिंदे,वेव्हल बाई,सायली अंबुर्ले यांच्यासह शिक्षक बंधू – भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# कर्जतमधील शिबिरात १०२ जणांकडून रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानच्या वतीने कर्जतमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात १०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत – खालापूरमध्ये आयोजित केलेले हे ५३२ वे शिबीर ठरले.

आपल्या महाराष्ट्रात सिकलसेल, निमिया, हिमोफेलिया, थेलेसेमिया, कॅन्सर इत्यादी आजाराचे अनेक रुग्ण आहेत. अश्या रुग्णांना वारंवार रक्त द्यावे लागते तसेच अनेक अपघात ग्रस्त रुग्णांना रक्ताची गरज लागते त्यासाठी या रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिराचे उदघाटन स्वामी नरेंद्राचार्य महाराजांच्या तसबिरीस पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून करण्यात आले.



या वेळी नगराध्यक्षा पुष्पाताई दगडे, नगरसेवक महेंद्र चंदन, अशोक राऊत, प्रशांत पाटील, नगरसेविका सुवर्णा जोशी, नगरसेविका मनिषा कानिटकर, माजी नगरसेविका मधुरा चंदन, महेंद्र कानिटकर, सयाजी गायकवाड, नदिम खान,अरिफ ऊर्फ लाला मुजावर, लियाकत खान, अमिर मणियार, विनोद पांडे, डॉ.प्रशांत सदावर्ते, कृष्णा जाधव आदी उपस्थित होते. राजाभाऊ कोठारी यांनी वयक्तिक ११३ रक्तदान केले. या वेळी रक्त संकलनाचे काम डिकसळ येथील रायगड हॉस्पिटलच्या रक्त केंद्राच्या सर्व आरोग्य सेवकांनी केले.

---

# रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त पथनाट्य

**चौक : प्रतिनिधी**

वाहतूक पोलीस रायगड यांच्या वतीने ३७वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षितता सप्ताह २०२६ साजरा करताना सानियो स्पेशल स्टील कंपनी खोपोली यांच्या वतीने चौक बाजारपेठेत सुरक्षा यमाच्या दरबारी हे पथनाट्य सादर करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हा वाहतूक पोलीस प्रमुख अभिजित भुजबळ, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र आरोळे, सपोनि. शिवाजी जुंदरे, चौक प्रभारी विशाल पवार उपस्थित होते.

पथनाट्यातून वाहतूक नियम आणि रस्ता सुरक्षा याबाबत जनजागृती करण्यात आली. या वेळी नागरिक शालेय विद्यार्थी, बाजारपेठे आलेले ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अपघाताप्रसंगी जखमींना मदत करण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी करून वाहतुक नियमांची सविस्तर माहिती दिली.

पथनाट्याचे लेखन दिग्दर्शन संजय म्हामुणकर यांनी केले असून त्याचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. वाहतूक सुरक्षा सप्ताह हा भारत सरकारद्वारे दरवर्षी जानेवारी महिन्यात साजरा केला जातो. याचा मुख्य उद्देश वाहनचालक आणि नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमांविषयी जागरूकता निर्माण करणे, अपघात टाळणे आणि रस्ते अधिक सुरक्षित बनवणे हा असतो, ज्यासाठी जनजागृती मोहीम राबवल्या जातात. वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेट आणि सीटबेल्ट वापरण्याचे महत्त्व पटवून देणे. बेशिस्त वाहन चालका मुळे होणारे अपघात आणि जीवितहानी टाळणे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी जनजागृती कार्यक्रम करून पोस्टर, बॅनर्स आणि माहितीपटांद्वारे प्रचार करण्यात येतो.

वाहतूक पोलीस प्रथमेश पाटील, अजित सुपेकर, अंकुश पोळे यांच्यासह सानियो स्पेशल स्टीलचे सर्व कर्मचारी व कामगारांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



---

# कुलकर्णी हॉस्पिटलसमोरील प्लॉटवर नाना नानी पार्क उभारण्याची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषदेच्या अगदी मोक्याच्या ठिकाणी असणाऱ्या कुलकर्णी हॉस्पिटल समोरील मोकळा प्लॉट सध्या डम्पिंग ग्राउंड बनला आहे जर हा प्लॉट आरक्षित असेल तर नगर परिषदेने हा प्लॉट ताब्यात घेऊन त्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी नाना नानी पार्क उभारून ज्येष्ठांची सोय करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार संजय पाटील यांनी नगर परिषदेकडे केली आहे.



या प्लॉटला लागूनच एसटी महामंडळाचा खोपोली गावातील थांबा असून त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खेड्यापाड्यातील व पनवेल मुंबईकडे जाणारे प्रवासी बसच्या प्रतीक्षेत असतात या प्लॉटमधील घाणीमुळे नागरिकांना नाकमुठित धरून बसची वाट पहावी लागते. याच स्वरूपाची मागणी ज्येष्ठ नागरिक सभेचे अध्यक्ष रवींद्र घोडके यांनी नगर परिषदेकडे केली आहे. नगर परिषदेच्या मालकीचा या परिसरात जर मोकळा प्लॉट असेल तर त्या ठिकाणी नाना नानी पार्क उभारावा किंवा नेहरू गार्डनला थोडेफार प्रमाणात खर्च करून उद्यानाची सुशोभीकरण करून नागरिकांची विशेषता जेष्ठ नागरिकांची बसण्या उठण्यासाठी त्याचप्रमाणे बाल मित्रांना खेळण्यासाठी त्या उद्यानाची सुशोभीकरण गरजेचे असल्याचेही रवींद्र घोडके यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष शेंडे मागणीकडे लक्ष देतील, अशी आशा ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली, काही वर्षांपूर्वी नगरपरिषदेतर्फे जुन्या पोलीस ठाण्याजवळ नाना नानी पार्क उभारण्याचा प्रयत्न केला परंतु तो प्रयत्न अयशस्वी झाला व पालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे या वेळी ज्येष्ठ नागरिकांनी यावेळी बोलताना प्रतिनिधींना माहिती दिली.


खोपोली शहरातील नगर परिषदेच्या मालकीचे उद्यानासाठी जे जे आरक्षित प्लॉट आहेत नगर परिषदेने त्याभोवती सुरक्षा कंपाऊंड करण्यात यावे अन्यथा त्या ठिकाणी अतिक्रमण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# प्रजासत्ताकदिनी कुस्तीची महादंगल

## दिग्गज पैलवानांची मुंबईत रणधुमाळी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत पहिल्यांदाच देशातील चार बलाढ्य कुस्ती राज्यांमधील अव्वल पैलवानांचा थरारक महामुकाबला पहायला मिळणार आहे. अर्जुन पुरस्कार विजेते व ऑलिम्पियन नरसिंह यादव (पोलीस उपायुक्त, मुंबई) यांच्या संकल्पनेतून आणि नरसिंह फाउंडेशन व नागरिक संरक्षण दल यांच्या संयुक्त विद्यमाने कुस्ती महादंगल २०२६ ही भव्य एकदिवसीय कुस्ती स्पर्धा २६ जानेवारी रोजी दुपारी २ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत मुंबईच्या कांदिवलीतील लोखंडवाला येथील मैदानात होईल.



या स्पर्धेत महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा व पंजाब या चार प्रमुख कुस्ती राज्यांचे संघ सहभागी होणार असून प्रत्येक संघातून पाच पुरुष व दोन महिला असे एकूण सात खेळाडू आपले कौशल्य दाखवणार आहेत. विजेत्या खेळाडूंना आकर्षक रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत.

मराठा वॉरियर्स (महाराष्ट्र) संघात पृथ्वीराज पाटील (महाराष्ट्र केसरी, वर्ल्ड मेडलिस्ट), रविराज चव्हाण, आदर्श पाटील, सोनबा गोंगाणे, अक्षय ढेरे यांचा समावेश आहे. महिला गटात अमृता पुजारी व सोनाली महाडिक या लढणार आहेत. शेर-ए-पंजाब (पंजाब) संघात करणदीप (पंजाब केसरी), संदीप मान, रोहित प्रजापत, उदय शर्मा, अभिषेक यादव तर महिला गटात प्रियंका सिकरवार व शिवानी सहभागी होणार आहेत. हरियाणा शूर (हरियाणा) संघात अंकुश, अमित, निवान, आकाश, सागर तर महिला गटात कुसुम दहिया व मोनी गुर्जर मैदानात उतरतील. यूपी योद्धा (उत्तर प्रदेश) संघात अभिनायक सिंह (यूपी केसरी), मुलायम यादव, तेजवीर यादव, आयुष चौधरी, विशाल सहानी तर महिला गटात प्रियंका सिकरवार व फ्रीडम यादव सहभागी होणार आहेत.

या भव्य स्पर्धेसाठी केंद्रीय मंत्री पियुष गोयल, मंत्री गिरीश महाजन, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, आमदार अतुल भातळखर, आमदार आशिष शेलार, आमदार संजय उपाध्याय हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## बॅडमिंटनपटू सिंधूचा विक्रम

**जकार्ता : वृत्तसंस्था**

भारताची स्टार महिला बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू सध्या इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत खेळत आहे. या स्पर्धेतील प्री-क्वार्टर फायनल सामन्यात डेन्मार्कच्या लाइन होजमार्क कजेरफेल्ड हिला सरळ सेटमध्ये पराभूत करत सिंधूने पुढच्या फेरीत प्रवेश केला. या विजासह तिने नवा इतिहास रचला आहे.

इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पी. ही. सिंधूची सुरुवात संघर्षपूर्ण राहिली. पहिला सामना जिंकण्यासाठी तिला मेहनत घ्यावी लागली होती, मात्र प्री-क्वार्टर फायनलमध्ये मिळालेला हा विजय सिंधूसाठी ऐतिहासिक ठरला. जे फुलराणी सायना नेहवाल हिला जमले नाही ते सिंधूने करून दाखवलेय. तिने कारकिर्दीतील ५०० सामने जिंकण्याचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. महिला बॅडमिंटन एकेरीत ५०० सामने जिंकणारी ती बॅडमिंटन कोर्टवरील पहिली महिला खेळाडू ठरली, तर बॅडमिंटन जगतात सहावी महिला खेळाडू आहे.

## पार्थ तोडकरचे नेमबाजीत उज्ज्वल यश

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील क्रीडाप्रेमींसाठी अभिमानाची बाब ठरणारी कामगिरी पार्थ परेश तोडकर या अवघ्या १३ वर्षांच्या विद्यार्थ्याने करून दाखवली आहे. कोकण उन्नती मित्र मंडळ इंग्रजी माध्यम शाळेत इयत्ता सातवीत शिक्षण घेत असलेला पार्थ नेमबाजी या अत्यंत कौशल्यपूर्ण क्रीडा प्रकारात राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपली ठाम ओळख निर्माण करत आहे. १२ ते १९ वर्षे वयोगटात सहभागी होत पार्थने रायफल नेमबाजीमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



५० मीटर अग्निशस्त्र रायफल (आडवे झोपून) नेमबाजी, १० मीटर हवेच्या रायफलने नेमबाजी यशाची उज्ज्वल वाटचाल जून महिन्यात वरळी (मुंबई) येथे झालेल्या २८व्या कॅप्टन इजेकिएल स्मृती महाराष्ट्र राज्य नेमबाजी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत पार्थची पूर्वराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

ऑगस्ट महिन्यात बालेवाडी (पुणे) येथे झालेल्या महाराष्ट्र रायफल नेमबाजी स्पर्धेत पार्थने राज्यस्तरीय चौथा क्रमांक पटकाविला. ऑक्टोबर महिन्यात मध्य प्रदेशातील भोपाळ येथे पार पडलेल्या ३४व्या अखिल भारतीय जी. व्ही. मार्लंकर स्मृती पूर्वराष्ट्रीय अग्निशस्त्र रायफल नेमबाजी स्पर्धेतून पार्थची थेट राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

डिसेंबर महिन्यात भोपाळ येथे झालेल्या ६८व्या राष्ट्रीय रायफल अग्निशस्त्र नेमबाजी स्पर्धेत पार्थने सहभाग घेतला. या स्पर्धेत त्याने ५८० गुण मिळवत आवश्यक पात्रता गुणांपेक्षा अधिक गुण प्राप्त करून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

पार्थच्या या यशामागे प्रशिक्षक पुष्कराज इंगवले आणि राजेश्वरी इंगवले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तो रत्नागिरी क्रीडा मंडळ-सिद्धांत रायफल व पिस्तूल नेमबाजी केंद्र, रायगड येथे नियमित सराव करतो.

## पहिल्या टी-२० सामन्यात भारताचा न्यूझीलंडवर विजय

**नागपूर : प्रतिनिधी**

भारताने दिलेल्या २३९ धावांच्या विशाल लक्षाचा पाठलाग करताना न्यूझीलंडने कडवी झुंज दिली, मात्र विजयाचे शिखर गाठण्यात त्यांना अपयश आले. भारताच्या बलाढ्य फलंदाजीमुळे मिळालेल्या मोठ्या धावसंख्येच्या जोरावर टीम इंडियाने हा सामना सहज खिशात टाकला.

न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली होती. सलामीवीर डेव्हन कॉनवे पहिल्याच षटकात अर्शदीपचा शिकार झाला, मात्र त्यानंतर ग्लेन फिलीप्साने वादळी फलंदाजी करत भारतीय गोटात घबराट निर्माण केली होती. फिलीप्साने क्लीन हिट्स मारत वरुण चक्रवर्ती आणि जसप्रीत बुमराहसारख्या दिग्गज गोलंदाजांवरही हल्ला चढवला. जोपर्यंत फिलीप्सा आणि चॅपमन खेळत होते, तोपर्यंत न्यूझीलंड सामन्यात कायम होते, मात्र हे दोघे बाद होताच किवींचा डाव पत्त्यासारखा कोसळला.

तत्पूर्वी अभिषेक शर्माने स्फोटक फलंदाजीसह केलेल्या ८४ धावांच्या खेळीसह अखेरच्या षटकात रिंकू सिंह याने अवघ्या २० चेंडूत केलेल्या ४४ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर भारतीय संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात सात विकेट्सच्या मोबदल्यात २३८ धावा केल्या होत्या. त्यानंतर न्यूझीलंडच्या संघाला सात बाद १९० धावांवर रोखत टीम इंडियाने ४८ धावांसह दमदार विजय नोंदवला.

## कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साह पूर्ण वातावरणात झाला. यामध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक अशा विविध गटांमधील विद्यार्थ्यांच्या धावणे, कबड्डी, रस्सीखेच, कॅरम, चेस, थ्रोबॉल, अडथळा शर्यत, रिले, डॉजबॉल क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये पालकांनीदेखील उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.

सर्वप्रथम क्रीडा सामन्याच्या प्रथेप्रमाणे क्रीडाज्योत प्रज्वलित करून शपथ घेण्यात आली. त्यानंतर प्रत्यक्ष खेळांना सुरुवात झाली. सरतेशेवटी विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांशी व पालकांशी संवाद साधताना संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रातही प्रावीण्य मिळवित आहे हे अभिमानास्पद असल्याचे म्हटले.

क्रीडा महोत्सवास शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्य आशा भगत, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवेचे मुख्याध्यापक किरण सुथार, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम व जुनियर कॉलेज कामोठेच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवेच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, रयत शिक्षण संस्थेचे पीआरओ बाळासाहेब कारंडे, शाळा व्यवस्थापन सदस्य, पालकवर्ग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाने हा उपक्रम यशस्वी झाला. पर्यवेक्षिका कोमल गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले.



## कराटे स्पर्धेत खेळाडूंचे यश

**उरण : बातमीदार**

अलिबाग येथे २६वी शितोरियू कराटे डो असोसिएशनची ऑल इंडिया ओपन चॅम्पियन कराटे स्पर्धा झाली. त्यामध्ये विविध वयोगटांमध्ये गोशीनरियु कराटे असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी विविध सहभाग घेऊन चमकदार कामगिरी केली.

या स्पर्धेत संपूर्ण भारतातून साडेनऊशे विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये गोशीनरियु कराटे असोसिएशनच्या मनस्वी हिराचंद ठाकूर हिने दोन सुवर्ण, स्वरा राकेश म्हात्रेने एक सुवर्ण व एक रौप्य, वेदा नवनीत पाटील, श्रुजा संजीत गावंड, साक्षी संदेश पाटील आणि अमिषा अरुण घरत यांनी कांस्यपदक जिंकले.

यशस्वी विद्यार्थ्यांना सिहान राजू कोळी (इंडिया प्रेसिडेंट, गोशीनरियु कराटे), गोपाळ म्हात्रे, परेश पावस्कर, अमिषा खरात, राकेश म्हात्रे, भूषण म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले.

## हार्दिक पांड्याकडून गौतमी नाईकचे कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या भारतात महिला क्रिकेट लीग २०२६ स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने गुजरात जायंट्सवर एकतर्फी विजयाची नोंद केली. दरम्यान, सामन्यानंतर क्रिकेटपटू हार्दिक पांड्याने तिला एक खास व्हिडीओ मेसेज दिला.




या सामन्यात आरसीबीची फलंदाज गौतमी नाईकने ५५ चेंडूत सात चौकार आणि एक षटकाराच्या सहाय्याने ७७ धावांची तुफानी खेळी केली. या दमदार खेळीच्या बळावर तिची प्लेअर ऑफ द मॅच म्हणून निवड करण्यात आली.

महिला प्रीमियर लीगकडून हार्दिक पांड्याचा एक खास व्हिडीओ मेसेज देणारा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये तो म्हणाला, हाय गौतमी, मी हार्दिक. मला समजलंय की, मी तुझा क्रिकेटमधील आदर्श आहे. मला युवा खेळाडूंना प्रेरित करायला खूप आवडते. पहिल्या अर्धशतकाबद्दल तुझे खूप खूप अभिनंदन! खेळाचा आनंद घे. मला आशा आहे की, आयुष्यात पुढे तू संघासाठी आणि देशासाठी आणखी चांगली कामगिरी करशील. अशीच मेहनत करत राहा, शिस्तीचे पालन कर आणि मजा कर.

आपल्या आवडत्या खेळाडूने आपले कौतुक केल्यानंतर आनंद गगनात मावेनासा होतो. असेच काहीसे गौतमी नाईकसोबत घडले. हार्दिकने तिला व्हिडीओ मेसेज शेअर केला आहे, यावर तिचा विश्वासच बसत नव्हता. व्हिडीओ मेसेज पाहिल्यानंतर तिनेदेखील हार्दिकचे आभार मानले. हार्दिक आणि गौतमीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

## माणगाव महिला वकील संघाचा क्रीडा महोत्सव



**माणगाव : बातमीदार**

घे भरारी माणगाव महिला वकील संघाचा क्रीडा महोत्सव दुसऱ्या पर्वातील सामने १७ जानेवारी रोजी तिलोरे हॉटेल मानस येथे मोठ्या उत्साहात रंगले.

या क्रिकेट सामन्यांचे उद्‌घाटन जिल्हा व सत्र न्यायाधीश मुकेश पाटील, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एम.ए. पठाण, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ए.पी. मानव यांच्या हस्ते झाले. या वेळी क्रिकेट, कबड्डी, संगीत खूर्ची, बुद्धीबळ हे खेळ खेळण्यात आले.

या स्पर्धेला माणगाव बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.मोहन मेथा, उपाध्यक्ष ॲड.पुंडलिक मालोरे, सहसचिव ॲड. सुजित मेहता, ॲड. प्रकाश ओक, ॲड.विनोद घायाळ, ॲड.प्रसाद शेट, ॲड.पंकज खामगावकर, ॲड.रोशन पांढरे, ॲड.राहुल ओक, ॲड.यशवंत साधू, ॲड. साद जळगावकर, ॲड.चंद्रशेखर माणके, ॲड. सनील महाडिक व इतर मान्यवर उपस्थित होते.

## शार्दूल भोईरची सागरी भरारी

**नागोठणे : बातमीदार**

जांभूळटेप गावचा सुपुत्र ११ वर्षीय शार्दूल अमोल भोईर याने सागरी पोहण्याचा निर्धार करून करंजा जेट्टी ते गेट वे ऑफ इंडिया हे २४ किलोमीटरचे अंतर सहा तास २१ मिनिट २१ सेकंदात पार केले.

### करंजा ते गेट वे ऑफ इंडिया अंतर सहा तास २१ मिनिटांत केले पार



१९ जानेवारी रोजी रात्री २ वाजून २० मिनिटांनी शार्दूलने करंजा जेट्टी ते गेट वे ऑफ इंडिया हे अंतर पोहण्यास सुरवात केली. मेहनत व जिद्दीने सहा तास २१ मिनिट २१ सेकंदात कुठेही न थांबता त्याने हे अंतर पार केले.

शार्दूल हा उरण एज्युकेशन सोसायटी इयत्ता सहावीचा विद्यार्थी आहे. त्याने वयाच्या नवव्या वर्षापासून पोहण्यास सुरवात केली. यासाठी त्याला आई जागृती भोईर, वडील अमोल भोईर, प्रशिक्षक इंटरनॅशनल स्विमर संतोष पाटील, हितेश भोईर, सुनील पवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यामुळे तो हे अंतर सहजरित्या पार करू शकला.

गेट वे ऑफ इंडियाला पोहचल्यावर सर्व नातेवाईक, मित्र परिवार, व मान्यवरांकडून शार्दूलचे जंगी स्वागत करण्यात आले. या धाडसी मोहिमेबद्दल सर्वच स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

## फोटोग्राफर असोसिएशनची क्रिकेट स्पर्धा

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा फोटोग्राफर व व्हिडीओग्राफर असोसिएशन संलग्न कर्जत फोटोग्राफर असोसिशनच्या वतीने जिल्हास्तरीय क्रिकेटच्या सामन्यांचे आयोजन करण्यात आले. १२ संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.



कर्जत-दहिवली विभागाच्या बामच्या मळ्यातील मैदानावर आयोजित या स्पर्धेचे उद्‌घाटन माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते झाले. उद्‌घाटन समारंभाला उपगराध्यक्ष संतोष पाटील, मयुरी गजमल, अशोक पाटील, जिल्हाध्यक्ष समीर भायदे, उपाध्यक्ष समीर मालोदे, सेक्रेटरी आनंद निंबरे, खजिनदार जितेंद्र मेहता, उपखजिनदार दीपक बडगुजर, संस्थापक अध्यक्ष विवेक सुभेकर, संदीप पाटील, हरीशभाई, जयंतभाई, कर्जत फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष योगेश कुंभार, चंद्रकांत म्हसे, ओंकार दळवी, सनी कडू, मंगेश जंगम आदी उपस्थित होते.

## डब्ल्यूपीएलमध्ये वैष्णवी शर्मा चर्चेत

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला प्रीमियर लीगच्या चौथ्या हंगामातील स्पर्धा आता अखेरच्या टप्प्यात पोहचली असताना मेगा लिलावात निराशा पदरी आलेल्या वैष्णवी शर्माचे नशीब चमकले आहे. डब्ल्यूपीएलच्या मेगा लिलावात अनसोल्डचा टॅग लागलेल्या वैष्णवीची मुंबई इंडियन्सच्या संघात वाइल्ड कार्ड एन्ट्री झाली आहे.

डावखुऱ्या हाताने फिरकी गोलंदाजी करणाऱ्या वैष्णवी शर्माला डब्ल्यूपीएल लिलावात पाचपैकी एकाही फ्रँचायझी संघाने भाव दिला नव्हता, पण अपयशानंतर तिला टीम इंडियाची लॉटरी लागली. घरच्या मैदानातील श्रीलंकेविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील महिला संघातून तिने पदार्पण केले. पदार्पणाच्या पहिल्या लढतीत विकेटलेस राहिल्यावर तिने पाच सान्यांच्या मालिकेत संयुक्तरित्या सर्वाधिक विकेट्स घेत श्रीलंकेविरुद्धची मालिका गाजवली.

या कामगिरीनंतर आता ती हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील डब्ल्यूपीएल फ्रँचायझी टी-२० क्रिकेटमध्ये मुंबई इंडियन्सच्या संघाकडून खेळताना दिसणार आहे. दोन वेळच्या चॅम्पियन मुंबई इंडियन्सच्या संघाने ३० लाख या मूळ किमतीत वैष्णवीला संघात घेतले आहे. उर्वरित तिला किती संधी मिळणार व यात ती कशी छाप सोडणार ते पाहण्याजोगे असेल. डब्ल्यूपीएल च्या यंदाच्या हंगामात या दोघींच्यातील खास बाँडिंग आणि सेलिब्रेशनचा खास नजारा किती वेळा पहायला मिळणार तेही लक्षवेधी असेल.

## हर्षवीर सिंग सेखॉन ठरला सर्वोत्तम भारतीय सायकलपटू

**पुणे : प्रतिनिधी**

भारतातील पहिल्यावहिल्या 'UCI २.२' श्रेणीतील आंतरराष्ट्रीय बहु-स्तरीय सायकलिंग स्पर्धा 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६'च्या मुळशी-मावळ टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाच्या ल्यूक मडग्वे याने दमदार कामगिरी करत निर्विवाद वर्चस्व गाजवले, तर भारतीय राष्ट्रीय संघाच्या हर्षवीर सिंग सेखॉन याने सर्वोत्तम भारतीय सायकलपटू ठरण्याचा मान पटकावला.

हिंजवडी येथील टीसीएस सर्कल येथून सुरू झालेल्या ८७.२ किलोमीटरच्या 'मुळशी-मावळ माईल्स' या पहिल्या टप्प्यात ल्यूक मडग्वे याने अवघ्या दोन तास २१ सेकंदात शर्यत पूर्ण करत विजेतेपद मिळवले. सुरुवातीपासूनच वेगवान आणि तांत्रिक खेळाचे दर्शन घडवणाऱ्या या टप्प्यात शेवटच्या काही क्षणांत मडग्वे याने निर्णायक आघाडी घेत विजयावर शिक्कामोर्तब केले.

एस्टोनियाच्या 'क्विक प्रो टीम'चा अँड्रियास मॅटिल्डास (०२:००:२७) दुसऱ्या, तर बेल्जियमच्या 'टार्टलेटो-इसोरेक्स' संघाचा योर्बेन लॉरीसन (०२:००:३०) तिसऱ्या क्रमांकावर राहिला. णउख नियमांनुसार पहिल्या तीन क्रमांकाच्या खेळाडूंना अनुक्रमे १०, ६ आणि ४ सेकंदांचा टाइम बोनस देण्यात आला असून तो पुढील टप्प्यांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

सर्वसाधारण वर्गीकरण आणि पॉइंट्स वर्गीकरणात ल्यूक मडग्वे याने यलो आणि ग्रीन जर्सी मिळवली. बेस्ट क्लायंबर म्हणून क्रिस्टियन रायलेनु (चीन) याला पोलका डॉट जर्सी, सर्वोत्तम आशियाई खेळाडू म्हणून जंबालजाम्ट्स सैनबयार (मंगोलिया) याला ऑरेंज जर्सी, सर्वोत्तम युवा खेळाडू म्हणून तामर स्पिएरो (नेदरलँड) याला व्हाईट जर्सी, तर सर्वोत्तम भारतीय खेळाडू म्हणून हर्षवीर सिंग सेखॉन याला ब्लू जर्सी प्रदान करण्यात आली.

पुणे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासन आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या पाच दिवसांच्या स्पर्धेत ३५ देशांतील १७१ आंतरराष्ट्रीय सायकलपटू सहभागी झाले असून एकूण ४३७ किलोमीटरच्या या स्पर्धेमुळे पुण्याच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे जागतिक स्तरावर दर्शन घडत आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com